दादा भगवान प्ररूपित

# मी कोण आहे



स्वत: 'स्वत:पासून'च अनोळखी कधीपर्यंत राहणार? '**स्वत:कोण आहे**' हेच जाणून घेण्याची आवश्यकता आहे.

दादा भगवान कथित

# मी कोण आहे?

मूळ गुजराती संकलन : डॉ. नीरूबहन अमीन

अनुवाद : महात्मागण

**प्रकाशक :** **श्री अजित सी. पटेल**

**दादा भगवान आराधना ट्रस्ट,**

दादा दर्शन, 5, ममतापार्क सोसायटी,

नवगुजरात कॉलेजच्या मागे, उस्मानपुरा,

अहमदाबाद - 380014, गुजरात.

**फोन - ( 079 ) 39830100**

© All Rights reserved with - Dada Bhagwan Foundation Trust,

© 5, Mamta Park Society, B\h. Navgujarat College,

Usmanpura, Ahmedabad - 380014, Gujarat, India.

No part of this book may be used or reproduced in any manner whatsoever without written permission from the holder of the copyrights.

| | | |
|---|---|---|
| **प्रथम आवृत्ति** | : 1,500 | मे, 2008 |
| **रीप्रिन्ट** | : 17,500 | ऑगस्ट 2009 पासून ऑगस्ट 2015 पर्यंत |
| **नवीन रीप्रिन्ट** | : 10,000 | जुलै 2019 |

**भाव मूल्य :** 'परम विनय' आणि

'मी काहीच जाणत नाही', हा भाव!

**द्रव्य मूल्य :** **15 रुपये**

**मुद्रक :** अंबा ऑफसेट

B-99, इलेक्ट्रोनीक्स GIDC,

क-6 रोड, सेक्टर-25,

गांधीनगर-382044.

**फोन :** (079) 39830341

# त्रिमंत्र





नमो अरिहंताणं
नमो सिद्धाणं
नमो आयरियाणं
नमो उवज्झायाणं
नमो लोए सव्वसाहूणं
एसो पंच नमुक्कारो
सव्व पावप्पणासणो
मंगलाणं च सव्वेसिं
पढमं हवइ मंगलं ॥ १ ॥
ॐ नमो भगवते वासुदेवाय ॥ २ ॥
ॐ नमः शिवाय ॥ ३ ॥
जय सच्चिदानंद





# दादा भगवान कोण?

जून 1958 संध्याकाळची अंदाजे सहाची वेळ, सुरत स्टेशनवर अलोट गर्दी होती. रेल्वेच्या प्लेटफॉर्म नंबर तीनच्या बाकावर बसलेल्या श्री अंबालाल मूळजीभाई पटेल रुपी देहमंदिरात नैसर्गिक स्वरुपात कित्येक जन्मांपासून व्यक्त होण्यासाठी आतूर असलेले 'दादा भगवान' संपूर्णपणे प्रकट झाले आणि निसर्गाने सर्जन केले अध्यात्माचे अद्‌भुत आश्चर्य! एका तासात विश्वदर्शन लाभले! मी कोण? भगवंत कोण? जग कोण चालवत आहे? कर्म म्हणजे काय? मुक्ती कशाला म्हणतात? इत्यादी जगातील सर्व आध्यात्मिक प्रश्नांची रहस्ये संपूर्णपणे प्रकट झाली. अशाप्रकारे निसर्गाने विश्वाला प्रदान केले एक अद्वितीय, संपूर्ण दर्शन आणि ह्याचे माध्यम बनले अंबालाल मूळजीभाई पटेल, जे होते गुजरातच्या चरोतर जिल्ह्यातील भादरण गावचे पाटील, कॉन्ट्रॅक्टचा व्यवसाय करणारे आणि तरीही पूर्ण वीतराग पुरुष.

त्यांना प्राप्ती झाली तशी ते फक्त दोन तासात इतर मुमुक्षुनां सुद्धा आत्मज्ञानाची प्राप्ती करवित असत, त्यांच्या सिद्ध झालेल्या अद्‌भुत ज्ञान प्रयोगाद्वारे. त्याला अक्रम (क्रमविरहीत) मार्ग म्हटले जाते. अक्रम म्हणजे क्रमाशिवायचा आणि क्रम म्हणजे पायरी पायरीने, क्रमाक्रमाने वर चढणे! अक्रम म्हणजे लिफ्ट मार्ग! शॉर्ट कट!

ते स्वतः प्रत्येकाला 'दादा भगवान कोण?' याबद्दलची फोड करून देताना म्हणायचे की, ''हे दिसतात ते 'दादा भगवान' नाहीत. हे तर 'ए.एम. पटेल' आहेत. आम्ही ज्ञानीपुरुष आहोत आणि आत प्रकट झाले ते दादा भगवान आहेत. दादा भगवान तर 'चौदालोकाचे' नाथ आहेत, ते तुमच्यात पण आहेत, सर्वांमध्ये आहेत! तुमच्यात अव्यक्त रुपात आहेत आणि 'येथे' माझ्या आत संपूर्णपणे व्यक्त झालेले आहेत! माझ्या आत प्रकट झालेले 'दादा भगवान' यांना मी पण नमस्कार करतो.''

व्यापारात धर्म असावा परंतु धर्मात व्यापार नसावा. या सिद्धांताने त्यांनी आपले संपूर्ण जीवन व्यतीत केले. संपूर्ण जीवनात त्यांनी कधीही, कोणाकडूनही पैसे घेतले नाहीत, उलट स्वतःच्या व्यवसायातून झालेल्या फायद्यातून भक्तांना यात्रा करवित असत.

# दादा भगवान फाउंडेशनची प्रकाशित पुस्तके

## मराठी

1. भोगतो त्याची चूक
2. एडजस्ट एवरीव्हेर
3. जे घडले तोच न्याय
4. संघर्ष टाळा
5. मी कोण आहे ?
6. क्रोध
7. चिंता
8. प्रतिक्रमण
9. भावना सुधारे जन्मोजन्म
10. कर्माचे विज्ञान
11. पाप-पुण्य
12. आई-वडील आणि मुलांचा व्यवहार
13. पति-पत्नीचा दिव्य व्यवहार
14. समजपूर्वक प्राप्त ब्रह्मचर्य
15. मानव धर्म
16. मृत्युवेळी, आधी आणि नंतर
17. सेवा-परोपकार
18. दान
19. त्रिमंत्र
20. वर्तमान तीर्थंकर श्री सीमंधर स्वामी
21. चमत्कार
22. सत्य-असत्याचे रहस्य
23. वाणी, व्यवहारात
24. पैशांचा व्यवहार
25. क्लेश रहित जीवन
26. निजदोष दर्शनाने...निर्दोष!
27. प्रेम
28. गुरू-शिष्य
29. अहिंसा

## हिन्दी

1. ज्ञानी पुरुष की पहचान
2. सर्व दु:खों से मुक्ति
3. कर्म का सिद्धांत
4. आत्मबोध
5. मैं कौन हूँ ?
6. वर्तमान तीर्थकर श्री सीमंधर...
7. भुगते उसी की भूल
8. एडजस्ट एवरीव्हेयर
9. टकराव टालिए
10. हुआ सो न्याय
11. चिंता
12. क्रोध
13. प्रतिक्रमण
14. दादा भगवान कौन ?
15. पैसों का व्यवहार
16. अंत:करण का स्वरूप
17. जगत कर्ता कौन ?
18. त्रिमंत्र
19. भावना से सुधरे जन्मोंजन्म
20. प्रेम
21. माता-पिता और बच्चों का व्यवहार
22. समझ से प्राप्त ब्रह्मचर्य
23. दान
24. मानव धर्म
25. सेवा-परोपकार
26. मृत्यु समय, पहले और पश्चात
27. निजदोष दर्शन से... निर्दोष
28. पति-पत्नी का दिव्य व्यवहार
29. क्लेश रहित जीवन
30. गुरु-शिष्य
31. अहिंसा
32. सत्य-असत्य के रहस्य
33. चमत्कार
34. पाप-पुण्य
35. वाणी, व्यवहार में...
36. कर्म का विज्ञान
37. आप्तवाणी - 1 से 9 और 13 (पूर्वार्ध-उत्तरार्ध)
38. समझ से प्राप्त ब्रह्मचर्य (पूर्वार्ध-उत्तरार्ध)

★ **दादा भगवान फाउन्डेशन द्वारे गुजराती आणि इंग्रजी भाषेत सुद्धा बरीच पुस्तके प्रकाशित झाली आहे। वेबसाइट www.dadabhagwan.org वर सुद्धा आपण ही सगळी पुस्तके प्राप्त करू शकता।**

★ **प्रत्येक महिन्यात हिन्दी, गुजराती आणि अंग्रेजी भाषेत दादावाणी मेगेझीन प्रकाशित करीत आहे।**

# संपादकीय

जीवनात जे काही समोर येते, त्याचे पूर्णपणे रियलाइजेशन (ओळख) केल्याशिवाय मनुष्य त्याला आपलेसे करत नाही. सगळ्याचे रियलाइजेशन केले. मात्र 'सेल्फ' रियलाइजेशनच केले नाही. अनंत जन्मापासून 'मी कोण आहे?' याची ओळख करून घेतली नाही, म्हणून तर या भटकंतीचा अंत होत नाही. याची ओळख कशी होईल?

ज्याला स्वत:ची ओळख झाली आहे, अशी व्यक्तीच अन्य व्यक्तीना सहजपणे ओळख करून देऊ शकते. अशी विभूती म्हणजे स्वयं 'ज्ञानी पुरुष'च! की ज्यांना या संसारात काहीही जाणणे, किंवा काहीही करण्याचे बाकी उरलेले नाही तेच। असे ज्ञानी पुरुष परम पूज्य दादाश्री, या काळात आमच्यामध्ये येऊन, आपल्या भाषेत, आपण समजू शकतो अशा सरळ भाषेत, प्रत्येकाचा मूळ प्रश्न 'मी कोण आहे' याचे उत्तर अगदी सहज सांगतात.

इतकेच नव्हे, तर हा संसार काय आहे? तो कशाप्रकारे चालत आहे? कर्ता कोण? भगवंत कोण आहेत? मोक्ष काय आहे? ज्ञानी पुरुष कोणाला म्हणतात? सीमंधर स्वामी कोण आहेत? संत, गुरू आणि ज्ञानी पुरुष यात काय फरक आहे? ज्ञानींना कशाप्रकारे ओळखावे? ज्ञानी काय करू शकतात? आणि त्यातही परम पूज्य दादाश्रींचा अक्रम मार्ग काय आहे? क्रमा क्रमाने तर मोक्षमार्गावर अनंत जन्मापासून चढतच आलो आहोत, परंतु 'लिफ्ट' पण मोक्षमार्गात असू शकते ना?! अक्रम मार्गाने, या काळात, संसारात राहूनही मोक्ष आहे आणि मोक्ष कसा प्राप्त करावा याची पूर्ण समज आणि योग्य दिशेची प्राप्ती परम पूज्य दादाश्रींनी करून दिली आहे...

'मी कोण आहे' याची ओळख झाल्यानंतर त्याची अनुभूति कशी राहते? तर संसारातील व्यवहार पार पाडताना संपूर्ण निर्लेप आत्मस्थितिच्या अनुभूतीमध्ये राहू शकतो. आधि-व्याधि आणि उपाधिमध्येही निरंतर स्वसमाधि राहू शकते, अशा अक्रम विज्ञानाच्या प्राप्तिनंतर हजारों महात्म्यांचा अनुभव आहे. या सगळ्याच्या प्राप्तिसाठी प्रस्तुत संकलन मोक्षार्थीसाठी मोक्षमार्गात दीपस्तंभ बनून राहो हीच प्रार्थना.

**- डॉ. नीरूबहन अमीन सच्चिदानंद**

# मी कोण आहे?

## (1) 'मी' कोण आहे?

### वेगळे, नाव आणि 'स्वतः'

**दादाश्री :** काय नाव आहे तुमचे?

**प्रश्नकर्ता :** माझे नाव चंदुलाल (वाचकाने चंदुलालच्या जागी स्वतःचे नाव समजावे) आहे.

**दादाश्री :** खरोखर तुम्ही चंदुलाल आहात?

**प्रश्नकर्ता :** हो.

**दादाश्री :** चंदुलाल तर तुमचे नाव आहे. चंदुलाल हे तुमचे नाव नाही का? तुम्ही 'स्वतः' चंदुलाल आहात की तुमचे नाव चंदुलाल आहे?

**प्रश्नकर्ता :** हे तर नाव आहे.

**दादाश्री :** हो, तर मग 'तुम्ही' कोण? जर 'चंदुलाल' तुमचे नाव आहे तर 'तुम्ही' कोण आहात? तुमचे नाव आणि तुम्ही वेगळे नाहीत का? 'तुम्ही' नावापासून वेगळे आहात, तर 'तुम्ही' (स्वतः) कोण आहात? तुमच्या लक्षात येत आहे ना, की मी काय सांगू इच्छित आहे? 'हा माझा

चष्मा' असे जर सांगितले तर चष्मा आणि मी वेगळे झालो ना? तसेच तुम्ही स्वत: नावापासून वेगळे आहात, असे आता नाही का वाटत?

जसे की दुकानाचे नाव ठेवतात 'जनरल ट्रेडर्स', तर तो काही गुन्हा नाही, पण त्याच्या शेठना आपण अशी हाक मारू की 'एय! जनरल ट्रेडर्स, इकडे या.' तर शेठ काय म्हणतील की 'माझे नाव तर जयंतीलाल आहे आणि 'जनरल ट्रेडर्स' तर माझ्या दुकानाचे नाव आहे.' अर्थात दुकानाचे नाव वेगळे आणि शेठ त्यापासून वेगळे, माल वेगळा, सर्व काही वेगळेच असते ना? तुम्हाला काय वाटते?

**प्रश्नकर्ता :** बरोबर आहे.

**दादाश्री :** परंतु येथे तर, 'नाही, मीच चंदुलाल आहे' असे म्हणता. म्हणजे दुकानाचा बोर्ड पण मी, आणि शेठ पण मीच. तुम्ही चंदुलाल आहात, हे तर ओळखण्याचे साधन आहे.

## परिणाम होतो, तर आत्मस्वरूप नाही

तुम्ही चंदुलाल बिलकुल नाही असे पण नाही. तुम्ही आहात चंदुलाल, पण 'बाय रिलेटिव्ह व्ह्यू पॉइंट' (व्यावहारिक दृष्टी)ने, यू आर चंदुलाल इज करेक्ट.

**प्रश्नकर्ता :** मी तर आत्मा आहे, पण नाव चंदुलाल आहे.

**दादाश्री :** हो, पण आता 'चंदुलाल'ला जर कोणी शिवी दिली तर 'तुमच्यावर' त्याचा परिणाम होणार की नाही?

**प्रश्नकर्ता :** परिणाम तर होणारच.

**दादाश्री :** तर मग तुम्ही 'चंदुलाल' आहात, 'आत्मा' नाहीत. तुम्ही आत्मा असतात तर तुमच्यावर परिणाम झाला नसता पण परिणाम होतो, म्हणजेच तुम्ही चंदुलाल आहात.

चंदुलालच्या नावाने कोणी शिव्या दिल्या तर तुम्ही त्याला पकडता. चंदुलालचे नाव घेऊन कोणी उलटसुलट बोलले तर तुम्ही भिंतीला कान लावून ऐकता. आम्ही विचारतो की, 'भाऊ, भिंत तुम्हाला काही सांगत आहे का?' तेव्हा तुम्ही म्हणता, 'नाही, भिंत नाही, पण आत माझ्या बद्दल बोलत आहेत, ते मी ऐकत आहे.' कोणाबद्दल बोलत आहेत? तेव्हा सांगता, 'चंदुलाल' बद्दल. अहो, पण तुम्ही तर चंदुलाल नाहीत. तुम्ही जर आत्मा असता तर चंदुलालची गोष्ट स्वत:वर घेतली नसती.

**प्रश्नकर्ता :** वास्तवात तर 'मी आत्माच आहे' ना?

**दादाश्री :** पण अजून तुम्ही आत्मा झालेले नाहीत ना? चंदुलालच आहात ना? 'मी चंदुलालच आहे' हा आरोपितभाव आहे. 'मी चंदुलाल आहे' अशी बिलीफ (मान्यता) तुमच्या मनात घर करून बसली आहे, ही रॉंग बिलीफ (चुकीची मान्यता) आहे.

## (2) बिलीफ, रॉंग-राईट

### कितीतरी रॉंग बिलीफ

'मी चंदुलाल आहे' ही तुमची मान्यता, ही बिलीफ तर रात्री झोपेतही हटत नाही ना! मग लोक तुमचे लग्न करवून तुम्हाला सांगतात, 'तुम्ही आता या स्त्रीचे पती आहात' मग तुम्ही तसे स्वामित्व मानता. मग 'मी हिचा पती आहे, पती आहे' करत राहता. कोणी नेहमीसाठी पती असतो का? डायवोर्स झाल्यानंतर दुसऱ्या दिवशी तिचा पती राहतो का? अर्थात या सगळ्या रॉंग बिलीफस् घर करून बसल्या आहेत.

'मी चंदुलाल आहे' ही रॉंग बिलीफ आहे. मग 'या स्त्रीचा पती आहे' ही दुसरी रॉंग बिलीफ, 'मी वैष्णव आहे ही तिसरी रॉंग बिलीफ'. 'मी वकील आहे' ही चौथी रॉंग बिलीफ, 'मी ह्या मुलाचा पिता आहे' ही पाचवी रॉंग बिलीफ. 'ह्याचा मामा आहे' ही सहावी रॉंग बिलीफ.

'मी गोरा आहे' ही सातवी रॉंग बिलीफ. 'मी पंचेचाळीस वर्षाचा आहे', ही आठवी रॉंग बिलीफ. 'मी यांचा भागीदार आहे' ही पण रॉंग बिलीफ. 'मी इन्कमटॅक्स भरणारा आहे' असे तुम्ही सांगितले तर ती सुद्धा रॉंग बिलीफ. मग अशा तर किती रॉंग बिलीफस् घर करून बसल्या असतील?

## 'मी' चे स्थान परिवर्तन

'मी चंदुलाल आहे' हा अहंकार आहे. कारण जिथे 'मी' नाही, तिथे 'मी'चे आरोपण केले, त्याचे नाव अहंकार.

**प्रश्नकर्ता :** 'मी चंदुलाल आहे' यात अहंकार कुठे आला? 'मी असा आहे, मी तसा आहे' असे केले तर गोष्ट वेगळी आहे. पण सहजपणे हे सांगितले, तर त्यात अहंकार कुठे आला?

**दादाश्री :** सहजभावे बोललात तरी काय अहंकार निघून जातो? 'माझे नाव चंदुलाल आहे' असे सहज जरी बोललात तरी पण तो अहंकारच आहे. कारण तुम्ही 'जे आहात' हे जाणत नाही आणि 'जे नाही आहात' त्याचे आरोपण करतात, तो सर्व अहंकारच आहे ना!

'तुम्ही चंदुलाल आहात' हे ड्रामेटिक (नाटकीय) गोष्ट आहे. अर्थात 'मी चंदुलाल आहे' असे बोलण्यास हरकत नाही पण 'मी चंदुलाल आहे' ही बिलीफ मात्र बसायला नको.

**प्रश्नकर्ता :** हो, नाही तर 'मी'चे पद आले.

**दादाश्री :** जर 'मी,' 'मी'च्या जागेवर बसला तर तो अहंकार नाही. इथे तर 'मी' मूळ जागेवर नाही पण आरोपित जागेवर आहे, म्हणून अहंकार. आरोपित जागेवरून 'मी' बाजूला झाला आणि मूळ जागेवर बसला तर अहंकार गेला समजा. म्हणजे 'मी' काढायचा नाही. 'मी'ला त्याच्या एक्जेक्ट जागेवर (यथार्थ स्थानावर) बसवायचे.

## ‘स्वत:’ ला स्वत:ची ओळख नाही

हा तर अनंत जन्मापासून स्वत: ‘स्वत:’पासून गुप्त राहण्याचा प्रयत्न आहे. स्वत:, ‘स्वत:’पासून गुप्त राहणे आणि दुसऱ्यांचे मात्र सगळे काही जाणणे, हेही आश्चर्यच आहे ना! स्वत: स्वत:पासून किती काळ गुप्त राहणार? कधीपर्यंत गुप्त राहणार? ‘स्वत: कोण आहे’ हे ओळखण्यासाठीच तर हा जन्म आहे. मनुष्य जन्म ‘स्वत: कोण आहे’ याचा शोध घेण्यासाठीच आहे. नाही तर तोपर्यंत भटकत राहणार. ‘मी कोण आहे’ हे जाणावे तर लागेल ना? ‘तुम्ही स्वत: कोण आहात’ हे जाणावे लागेल की नाही?

# ( 3 ) ‘I’ आणि ‘My’ ला वेगळे करण्याचा प्रयोग

## सेपरेट ‘I’ and ‘My’

(‘मी’ आणि ‘माझे,’ याला वेगळे करा)

तुम्हाला सांगितले की, सेपरेट ‘I’ and ‘My’ with सेपरेटर तर तुम्ही ‘I’ आणि ‘My’ला सेपरेट करू शकणार का? ‘I’ आणि ‘My’ला सेपरेट करायला हवे की नाही? आणि हे कसे करायचे ते कधी ना कधी तरी जाणून घ्यावे लागेलच ना? सेपरेट ‘I’ आणि ‘My’, जसे दुधासाठी सेपरेटर असते ना, त्यातून मलई सेपरेट (वेगळी) करतात. तसेच हे वेगळे करायचे आहे.

तुमच्याजवळ ‘My’ (माझे) म्हणता येईल अशी कोणती गोष्ट आहे? ‘I’ (मी) एकटाच आहे की ‘My’ सोबत आहे?

**प्रश्नकर्ता :** ‘My’ सोबत असणारच.

**दादाश्री :** काय काय ‘My’ आहे तुमच्याजवळ?

**प्रश्नकर्ता :** माझे घर आणि घरातील सगळ्या वस्तू.

**दादाश्री :** ते सर्व स्वत:च्या म्हणणार ? आणि बायको कोणाची.

**प्रश्नकर्ता :** ती पण माझी.

**दादाश्री :** आणि मुले कोणाची ?

**प्रश्नकर्ता :** ती पण माझी.

**दादाश्री :** आणि हे घड्याळ कोणाचे ?

**प्रश्नकर्ता :** ते पण माझे.

**दादाश्री :** आणि हे हात कोणाचे ?

**प्रश्नकर्ता :** हात पण माझे आहेत.

**दादाश्री :** मग माझे डोके, माझे शरीर, माझे पाय, माझे कान, माझे डोळे असे सांगाल. या शरीराच्या साऱ्या अवयवांना 'माझे' म्हणतात, तेव्हा 'माझे' म्हणणारे 'तुम्ही' कोण आहात ? याचा विचार केला की नाही ? 'My' नेम इज चंदुलाल' म्हणणार आणि मग बोलणार 'मी चंदुलाल आहे.' यात विरोधाभास नाही जाणवत ?

**प्रश्नकर्ता :** जाणवतो.

**दादाश्री :** तुम्ही चंदुलाल आहात, पण यात 'I' आणि 'My' दोन आहेत. हे 'I' आणि 'My'च्या दोन रेल्वे लाईनस् वेगळ्याच असतात. पॅरेललच (समांतर) असतात, कधीच एकत्र मिळत नाहीत. तरी पण तुम्ही एकाकार मानता, तर याला समजून घेऊन यातून 'My'ला वेगळे करा. आपल्यात जो 'My' आहे त्याला एका बाजूला ठेवा. 'My' हार्ट, तर त्याला एका बाजूला ठेवा. या शरीरातून अजून काय काय वेगळे करावे लागेल ?

**प्रश्नकर्ता :** पाच इंद्रिये.

**दादाश्री :** हो, सर्वच. पाच इंद्रिये, पाच कर्मेंद्रिये. आणि मग 'माय माइंड' म्हणता की 'आय एम माइंड' म्हणता?

**प्रश्नकर्ता :** 'माय माइंड' (माझे मन) म्हणतो.

**दादाश्री :** माझी बुद्धी म्हणता ना?

**प्रश्नकर्ता :** हो.

**दादाश्री :** माझे चित्त म्हणता ना?

**प्रश्नकर्ता :** हो.

**दादाश्री :** आणि 'माय इगोइजम' (माझा अहंकार) बोलता की 'आय एम इगोइजम' (मी अहंकार) बोलता?

**प्रश्नकर्ता :** 'माय इगोइजम.'

**दादाश्री :** 'माय इगोइजम' म्हणाल तर त्याला वेगळे करू शकाल. पण त्याच्या पुढे जे आहे, त्याच्यात तुमचा हिस्सा काय आहे, हे तुम्ही जाणत नाही. म्हणून पूर्णपणे सेपरेशन होऊ शकत नाही. तुम्ही, तुमच्या काही हद्दीपर्यंतच जाणू शकता. तुम्ही स्थूल वस्तूच जाणता, सूक्ष्मची आजून ओळख नाही. सूक्ष्मला वेगळे करणे, परत सूक्ष्मतर वेगळे करणे, परत सूक्ष्मतम वेगळे करणे हे तर ज्ञानी पुरुषांचेच काम आहे. पण एक एक करून सारे स्पेअरपार्टस वजा करत गेले तर 'I' आणि 'My', दोन्ही वेगळे होऊ शकतील ना? 'I' आणि 'My'. दोन्ही वेगळे केल्यानंतर शेवटी काय उरणार? 'My'ला एका बाजूला ठेवले तर शेवटी काय उरणार?

**प्रश्नकर्ता :** 'I' (मी).

**दादाश्री :** हा, 'I' तेच तुम्ही 'स्वत:' आहात. बस, या 'I' लाच रियलाइज करायचे (ओळखायचे) आहे.

**प्रश्नकर्ता :** तर असे वेगळे करून हे जाणून घ्यायचे आहे की जे बाकी उरले तो 'मी' आहे ?

**दादाश्री :** हो, सेपरेट करून जे बाकी उरले, ते तुम्ही स्वतः आहात, 'I' हे तुम्ही स्वतःच आहात. त्याचा शोध तर घेतला पाहिजे ना? जर 'I' आणि 'My' वेगळे केले तर हा सोपा मार्ग आहे ना?

**प्रश्नकर्ता :** तसा मार्ग सोपा आहे, पण तो सूक्ष्मतर आणि सूक्ष्मतमसुद्धा वेगळे होणार तेव्हाच ना? हे ज्ञानींशिवाय होऊ शकत नाही ना?

**दादाश्री :** हो, हे ज्ञानी पुरुष सांगतील. म्हणून तर आम्ही सांगतो की, Separate 'I' आणि 'My' with ज्ञानीज सेपरेटर. त्या सेपरेटरला शास्त्रकार काय म्हणतात? भेदज्ञान म्हणतात. भेदज्ञानाशिवाय तुम्ही कसे वेगळे करणार? कोणकोणत्या वस्तू स्वतःचा आहेत आणि कोणकोणत्या वस्तू स्वतःच्या नाहीत या दोन्हींचे तुम्हाला भेदज्ञान नाही. भेदज्ञान म्हणजे हे सर्व 'माझे' आहे आणि 'मी' त्यांच्यापासून वेगळा आहे, म्हणून ज्ञानी पुरुषांजवळ, त्यांच्या सान्निध्यात राहिलात तर भेदज्ञान प्राप्त होईल आणि मग तुमचे ('I' आणि 'My') सेपरेट होऊन जातील.

'I' आणि 'My'चा भेद केला तर हे खूप सोपे होईल ना? मी ही पद्धत सांगितली, त्यानुसार अध्यात्म सरळ आहे की कठीण आहे? नाही तर या काळातील जीवांचे शास्त्र वाचून वाचून दम निघून जाईल.

**प्रश्नकर्ता :** हे समजण्यासाठी तरी आपल्यासारख्या ज्ञानी पुरुषांची गरज भासणारच ना?

**दादाश्री :** हो, गरज तर भासणार, पण ज्ञानी पुरुष तर जास्त नसतातच ना. तरी जेव्हा कधी असतील तेव्हा तुमचे (मोक्षाचे) काम करून घ्या. ज्ञानी पुरुषाचे 'सेपरेटर' एकाद्या तासासाठी घ्या. त्याचे भाडे-बिडे नसते. त्या सेपरेटरने सेपरेट करून घ्या. त्याने 'I' वेगळा

होईल, नाही तर होणार नाही, 'I' वेगळा झाल्यावर सर्व काम होऊन जाईल. सर्व शास्त्रांचे सार इतकेच आहे.

आत्मा व्हायचे असेल तर 'माझे' सर्व समर्पित करावे लागेल. ज्ञानी पुरुषाला 'My' सोपवले तर एकटा 'I' तुमच्याजवळ राहील. 'I' विथ 'My' त्याचे नाव जीवात्मा. 'मी आहे आणि हे सर्व माझे आहे' ही जीवात्मा दशा आणि 'मीच आहे आणि माझे काही नाही' ती परमात्म दशा. म्हणजे 'My'मुळे मोक्ष होत नाही. 'मी कोण आहे' याचे ज्ञान झाल्यावर 'My' सुटते. 'My' सुटले तर सर्व सुटले.

'My' इज रिलेटिव्ह डिपार्टमेंट ॲन्ड 'I' इज रियल. अर्थात 'I' टेम्पररी नसतो. 'I' परमनन्ट आहे. 'My' टेम्पररी आहे म्हणजे आपल्याला 'I' शोधून काढायचा आहे.

# (4) संसारात उपरी कोण?

## ज्ञानीच ओळख करून देतील 'मी' ची!

**प्रश्नकर्ता :** 'मी कोण आहे' हे जाणून घेण्याची जी गोष्ट आहे, ती या संसारात राहून कसे शक्य होऊ शकते?

**दादाश्री :** मग ते कुठे राहून जाणू शकतो? संसाराशिवाय आणखी कुठली अशी जागा आहे की जिथे राहून जाणू शकतो? या जगात तर सर्व संसारीच आहेत आणि सर्व संसारातच राहतात. इथे 'मी कोण आहे' हे जाणण्यास मिळेल. 'तुम्ही कोण आहात' हेच विज्ञान इथे समजून घ्यायचे आहे. तेव्हा इथे या, आम्ही तुम्हाला ओळख करून देऊ.

आणि हे जे काही आम्ही तुम्हाला सांगतो ते तुम्ही करा असे आम्ही सांगत नाही. ते तुमच्याकडून होईल असेही नाही. आम्ही तर तुम्हाला असे सांगतो की आम्ही तुमचे सर्व काही करून देऊ, तेव्हा तुम्ही चिंता करू नका. सर्व प्रथम हे समजून घ्या की वास्तवात 'तुम्ही'

कोण आहात आणि काय जाणून घेण्यासारखे आहे ? खरी गोष्ट काय आहे ? करेक्टनेस काय आहे ? दुनिया काय आहे ? हे सर्व काय आहे ? परमात्मा काय आहे ?

परमात्मा आहे का ? परमात्मा आहेच, आणि तो तुमच्याजवळच आहे. बाहेर कुठे शोधत आहात ? पण कोणी हे दार उघडून दिले तेव्हाच तर दर्शन घेऊ ना. हा दार असा बंद झाला आहे की स्वतः उघडणे शक्यच नाही. ते तर जे स्वतः तरले आहेत असे तरणतारणहार ज्ञानी पुरुषांचेच काम आहे.

## स्वतः केलेल्या चुकाच स्वतःवर उपरी

भगवंत हे तर तुमचे स्वरूप आहे. तुमच्यावर कोणीच *उपरी* (वरिष्ठ, वरचढ) नाही. कोणी बापही *उपरी* नाही. तुम्हाला कोणी काही करणाराही नाही. तुम्ही स्वतंत्रच आहात, केवळ स्वतःच्या चुकांमुळेच तुम्ही बांधलेले आहात.

तुमच्या *उपरी* कोणीच नाही. आणि तुमच्यात ढवळाढवळ करणाराही कोणीच नाही. इतके सारे जीव आहेत, पण कुठल्याही जीवाची तुमच्यात ढवळाढवळ नाही. आणि हे लोक जी ढवळाढवळ करतात, ती तुमच्या चुकीमुळेच करतात. पूर्वी तुम्ही जी ढवळाढवळ केली होती त्याचे हे फळ आहे. हे मी स्वतः 'बघून' सांगत आहे.

आम्ही ह्या दोन वाक्यात गॅरंटी देत आहोत, ज्यामुळे मनुष्य मुक्त राहू शकतो. आम्ही काय म्हणतो की,

'तुमचा *उपरी* या दुनियेत कोणी नाही. तुमच्या *उपरी* तुमच्या ब्लंडर्स आणि तुमच्या मिस्टेक्स आहेत. हे दोन नसतील तर तुम्ही परमात्माच आहात.'

आणि 'तुमच्यात कोणाची किंचितमात्र दखल नाही. कोणताही

जीव दुसऱ्या कोणत्याही जीवात किंचितमात्र दखल करू शकेल अशा स्थितित नाहीच. असे हे जग आहे.'

ही दोन वाक्य सर्व समाधान करून देतात.

# ( 5 ) जगात कर्ता कोण ?

## जगतकर्त्याची वास्तविकता!

फॅक्ट (खरी) वस्तू न समजल्यामुळेच हा सगळा गोंधळ झालेला आहे. आता तुम्हाला जे माहीत आहे ते जाणून घ्यायचे आहे, की 'जे माहीत नाही' ते जाणून घ्यायचे आहे ?

जग काय आहे ? कशाप्रकारे बनले आहे ? बनवणारा कोण ? तुमचे या जगाशी काय देणेघेणे ? तुमच्याशी तुमच्या नातेवाईकांचे काय देणेघेणे ! व्यापार-धंदा कुठल्या आधारावर चालतो ? मी कर्ता आहे की कुणी दुसरा कर्ता आहे ? हे सर्व जाणून घेण्याची गरज आहेच ना ?

**प्रश्नकर्ता :** हो, नक्कीच.

**दादाश्री :** म्हणून तुम्हाला सुरूवातीला काय जाणून घ्यायचे आहे, त्याबद्दलच सर्वात आधी बोलूया. जग कोणी बनवले असेल ? तुम्हाला काय वाटते ? कोणी बनवले असेल असे गुंतागुंतीचे हे जग ? तुमचे काय मत आहे ?

**प्रश्नकर्ता :** ईश्वरानेच बनवले असेल.

**दादाश्री :** तर मग त्याने जगाला चिंतेत का ठेवले ? चिंता नसलेली अवस्थाच नाही.

**प्रश्नकर्ता :** सगळेच चिंता करतात ना ?

**दादाश्री :** हो, मग त्याने हा संसार बनवला तो चिंतेचा का

बनवला ? सी.बी.आई.वाल्यांना पाठवून त्याला पकडून आणा. पण ईश्वर गुन्हेगार नाहीच. हे तर लोकांनीच ईश्वराला गुन्हेगार ठरवले आहे.

वास्तवात तर, गॉड इज नॉट क्रिएटर ऑफ धिस वर्ल्ड ॲट ऑल, ऑन्ली सायन्टिफिक सरकमस्टेन्शियल एविडन्स आहे हे. (परमेश्वर या जगाचा निर्माता नाहीच. हे फक्त वैज्ञानिक संयोगिक पुरावे आहेत). त्याला गुजरातीमध्ये मी 'व्यवस्थित शक्ती' म्हणतो. अर्थात ही सारी निसर्गाची रचना आहे. ही तर खूप सूक्ष्म गोष्ट आहे.

## तो मोक्ष म्हटला जात नाही

लहान मूल पण म्हणते की, 'ईश्वराने बनवले' मोठे संत देखील म्हणतात की 'ईश्वराने बनवले'. ही गोष्ट लौकिक आहे, अलौकिक नाही.

ईश्वर जर क्रिएटर (निर्माता) झाला असता तर तो नेहमीसाठी आपला *उपरी* ठरला असता आणि मोक्षासारखी गोष्टच नसती. पण मोक्ष आहे. ईश्वर क्रिएटर नाही. मोक्ष समजणारे लोक ईश्वराला क्रिएटर मानत नाहीत. 'मोक्ष' आणि 'ईश्वर क्रिएटर' या दोन्ही विरोधाभासी गोष्टी आहेत. क्रिएटर असेल तो कायमच उपकारी ठरेल आणि उपकारी झाला म्हणून शेवटपर्यंत *उपरी*च राहील.

## तर ईश्वराला कोणी बनवले ?

ईश्वराने बनवले, असे जर आम्ही अलौकिक दृष्टीने म्हणालो तर 'लॉजिक'वाले आम्हाला विचारतील की, 'मग ईश्वराला कोणी बनवले ?' म्हणून प्रश्न उभे राहतात. लोक मला सांगतात, 'आम्हाला वाटते ईश्वरच दुनियेचा कर्ता आहे. पण तुम्ही तर हे नाकारता, म्हणून तुमची ही गोष्ट आम्हाला मान्य होत नाही.' तेव्हा मी त्यांना विचारतो की जर ईश्वर कर्ता आहे असे मी स्वीकारले, तर त्या ईश्वराला कोणी बनवले ? हे तुम्ही मला सांगा. आणि त्या बनवणाऱ्याला कोणी बनवले ? जर कोणी

कर्ता असेल तर त्याचाही कर्ता असायला हवा, हे 'लॉजिक' आहे. मग याचा कधी अंतच येणार नाही. म्हणून ही गोष्ट चुकीची आहे.

## जगाचा प्रारंभही नाही, अंतही नाही...

म्हणजे कोणी बनवल्याशिवायच बनले आहे, कोणीही बनवलेले नाही हे. कोणी केले नाही, मग आता याबद्दल कोणाला विचारायचे? ज्याने हा सारा घोळ घातला आहे, जो याला जबाबदार आहे त्याला मी पण शोधत होतो, मी सगळ्या ठिकाणी शोध घेतला, पण तो कुठेही सापडला नाही.

मी 'फॉरीन'च्या सायन्टिस्टांना सांगितले 'गॉड क्रिएटर आहे, हे सिद्ध करण्यासाठी तुम्ही माझ्यासोबत थोडी चर्चा करा. जर तो क्रिएटर आहे तर त्याने कुठल्या वर्षी क्रिएट केले ते सांगा.' त्यावर ते म्हणाले, 'आम्हाला माहीत नाही.' मग मी विचारले 'पण त्याची बिगिनिंग (सुरूवात) झाली की नाही झाली?' तेव्हा म्हणाले, 'हो बिगिनिंग तर झालीच. क्रिएटर म्हटल्यावर बिगिनिंग तर असणारच.' ज्याची सुरूवात होते, त्याचा अंतही होणार. पण हे तर विनाअंत असलेले जग आहे. बिगिनिंग झाली नाही मग अॅन्ड कुठून होणार? हे तर अनादि अनंत आहे. ज्याची बिगिनिंग झाली नसेल, त्याचा कुणी बनवणारा असू शकत नाही, असे नाही का वाटत?

## भगवंताचा खरा पत्ता!

तेव्हा या फॉरिनच्या सायन्टिस्टनी विचारले, 'मग काय भगवंत नाही?' तेव्हा मी सांगितले, 'भगवंत नसेल तर, या जगात ज्या भावना आहेत, सुख आणि दुःख याचा अनुभव होत आहे तो अनुभव झालाच नसता, म्हणून भगवंत अवश्य आहे.' त्यांनी मला विचारले की, 'भगवंत कुठे राहतात?' मी सांगितले, 'तुम्हाला काय वाटते?' त्यावर ते म्हणाले, 'वर'. मी विचारले, 'वर कुठे राहतात? त्यांच्या गल्लीचा नंबर काय

कुठली गल्ली, जाणता का तुम्ही? पत्र पोहोचेल असा अचूक ॲड्रेस आपल्याजवळ आहे का?' वर तर कोणी बाप देखील नाही. सगळ्या ठिकाणी मी फिरून आलो. सर्व लोक म्हणत होते वर आहे. वर बोट दाखवत राहिले. म्हणून मला वाटले की सगळेच सांगतात, म्हणजे काही तरी असायला पाहिजे. म्हणून मी वर सगळ्या ठिकाणी शोधून आलो, तर वर फक्त आकाशच आहे, वर कोणीच सापडले नाही. वर कोणीही राहत नाही. नंतर त्या फॉरिनच्या सायन्टिस्टनी मला विचारले, 'भगवंताचा खरा पत्ता सांगाल का?' मी सांगितले, 'लिहून घ्या. गॉड इज इन एवरी क्रिएचर, व्हेदर विजिबल ओर इन्विजिबल', नॉट इन क्रिएशन.' (भगवंत, डोळ्यांना दिसणाऱ्या किंवा न दिसणाऱ्या प्रत्येक जीवात विद्यमान आहेत, पण मानव निर्मित कुठल्याही वस्तूत नाहीत.)

ह्या टेपरेकॉर्डरला 'क्रिएशन' म्हणतात. जितक्या मॅनमेड (मानव निर्मित) वस्तू आहेत, मनुष्याने बनवलेल्या वस्तू आहेत, त्यात भगवंत नाहीत. ज्या नैसर्गिक रचना आहेत त्यात भगवंत आहेत.

## स्वतःला अनुकूल असा सिद्धांत!

कितीतरी संयोग एकत्र आल्यानंतर कोणतेही कार्य होत असते. म्हणजे हा सायन्टिफिक सरकमस्टेन्शियल एविडन्सेसचा परिणाम आहे. याच्यात इगोइजम (अहंकार) करून, 'मी केले' म्हणून मिरवत राहता. पण चांगले झाल्यावर 'मी केले' आणि बिघडल्यावर 'माझे संयोग सध्या ठीक नाहीत' असे आपले लोक म्हणतात ना? संयोगाला मानतात ना, आपले लोक?

**प्रश्नकर्ता :** हो.

**दादाश्री :** कमाई होते तेव्हा त्याचा गर्वरस स्वतः चाखता आणि जेव्हा नुकसान होते तेव्हा बहाणे बनवतात. आम्ही विचारले, 'शेठजी, असे का झाले आता?' तेव्हा ते म्हणतात, 'भगवंत रुसले आहेत.'

**प्रश्नकर्ता :** हा तर स्वतःला अनुकूल, असा सिद्धांत झाला.

**दादाश्री :** हो, स्वतःला अनुकूल, पण असा आरोप भगवंतावर लावता कामा नये. वकीलावर आरोप लावला किंवा इतर कोणावर आरोप लावला तर ठीक आहे पण भगवंतावर आरोप करू शकतो का ?! वकील तर दावा करून हिशोब मागेल, पण याचा दावा कोण दाखल करणार ? याचे फळ तर पुढच्या जन्मी (संसाराची) भयंकर बेडी मिळेल. भगवंतावर आरोप करू शकतो का ?

**प्रश्नकर्ता :** नाही करू शकत.

**दादाश्री :** नाही तर म्हणणार, 'स्टार्स फेवरेबल (ग्रह अनुकूल) नाहीत.' किंवा मग 'माझा भागीदार वाईट आहे.' असे म्हणणार. भागीदारचे दोष दाखवतात. नाही तर 'सून पांढऱ्या पायाची आहे' असेही म्हणणार. पण स्वतःच्या डोक्यावर काही येऊ देत नाहीत. स्वतःच्या डोक्यावर कधी गुन्हेगारी घेत नाहीत. याबद्दल एका फॉरिनरशी माझी चर्चा झाली होती. त्यांनी विचारले, 'तुमचे इंडियन लोक गुन्हा स्वतःच्या डोक्यावर का येऊ देत नाहीत ?' मी सांगितले. 'हीच तर इंडियन पझल आहे. इंडियाचे सर्वात मोठे पझल (कोडे) असेल तर हेच आहे.'

## सायन्टिफिक सरकमस्टेन्शियल एविडन्स!

म्हणून बोला, जे काही बोलायचे असेल ते सर्व बोला. असा वार्तालाप करा की, जेणे करून सर्व खुलासा होईल.

**प्रश्नकर्ता :** हे, 'सायन्टिफिक सरकमस्टेन्शियल एविडन्स' समजले नाही.

**दादाश्री :** हे सर्व सायन्टिफिक सरकमस्टेन्शियल एविडन्स वर (वैज्ञानिक सांयोगिक पुराव्यांवर) आधारित आहे. संसारात एक पण परमाणू चेंज (बदल) होऊ शकत नाही, आता तुम्ही जेवायला बसलात,

तेव्हा तुम्हाला माहीत नसते की मी काय खाणार आहे ? बनवणाऱ्यालाही माहीत नाही की उद्या जेवणासाठी काय बनवायचे आहे ? हे कसे घडत असते हेच एक आश्चर्य आहे. तुम्हाला किती खाता येईल आणि किती नाही, हे सर्वच, परमाणूमात्र, निश्चित आहेत.

तुम्ही आज मला भेटलात, हे कशाच्या आधारावर भेटलात ? हा ऑन्ली सायन्टिफिक सरकमस्टेन्शियल एविडन्स आहे. अति अति गुह्य कारण आहे. ते कारण शोधून काढा.

**प्रश्नकर्ता :** पण ते शोधायचे कसे ?

**दादाश्री :** जसे आता तुम्ही इथे आलात, तर इथे येणे तुमच्या हातात नाही. ही तर तुमची मान्यता आहे. तुम्ही इगोइजम करता की, 'मी आलो आणि मी गेलो.' हे जे तुम्ही म्हणता, 'मी आलो' तर मग मी विचारतो, 'काल का आले नव्हते ?' तेव्हा असे पाय दाखवाल, मग काय समजायचे ?

**प्रश्नकर्ता :** पाय दुखत होते.

**दादाश्री :** हो, पाय दुखत होते, पायांचे कारण दिले तर यावरून नाही का समजणार, की तुम्ही येणारे की पाय येणारे ?

**प्रश्नकर्ता :** पण मीच आलो असेच म्हणणार ना ?

**दादाश्री :** तुम्हीच आलात नाही का ? मग जरी पाय दुखत असतील तरी पण तुम्ही याल का ?

**प्रश्नकर्ता :** माझी स्वत:ची इच्छा होती यायची, म्हणून आलो.

**दादाश्री :** हो, तुमची इच्छा होती, म्हणून आलात. पण हे पाय वगैरे सर्व ठीक होते म्हणून येऊ शकलात ना ? ठीक नसते तर ?

**प्रश्नकर्ता :** तर येऊ शकलो नसतो, हे बरोबर आहे.

**दादाश्री :** मग तुम्ही एकटे येऊ शकता का? जसे की एक मनुष्य रथात बसून इथे आला आणि म्हणाला, 'मी आलो, मी आलो' तेव्हा आम्ही विचारतो, ' तुमच्या पायाला तर पॅरॅलिसिस (पक्षाघात) झाला आहे, तर तुम्ही कसे आलात?' तेव्हा ते म्हणाले, 'रथातून आलो, पण मीच आलो, मीच आलो.' 'अहो, पण रथ आला की तुम्ही आलात?' तेव्हा ते म्हणाले, 'रथ आला.' मग मी विचारेन की, रथ आला की बैल आले?

म्हणजे बघा गोष्ट कुठून कुठे गेली? पण हे चुकीचे मानले आहे ना! सर्व संयोग अनुकूल असतील तर येऊ शकता, नाही तर येऊ शकत नाही. जर डोके दुखत असेल तर तुम्ही आला असाल तरी पण परत जाल. तुम्हीच येणारे-जाणारे असाल, तर मग डोके दुखण्याचे कारण सांगणार नाही ना? अरे, तेव्हा डोके आले होते की तुम्ही आला होता? किंवा जर कोणी रस्त्यात भेटले आणि म्हणाले, 'चला चंदुलाल माझ्याबरोबर' तेव्हा पण तुम्ही परत जाल. म्हणून येथे पोहोचण्यापर्यंत सगळे संयोग अनुकूल असतील व कोणी अडवणारा भेटला नाही तरच येवू शकता.

## स्वतःची सत्ता किती?

तुम्ही तर कधी खालेलेही नाही. हे तर सर्व चंदुलाल खातात आणि तुम्ही मनात मानता की मी खाल्ले. चंदुलाल खातात आणि संडासला पण चंदुलाल जातात. विनाकारण ह्यात अडकला आहात. हे तुम्हाला समजते का?

**प्रश्नकर्ता :** तुम्ही समजवा.

**दादाश्री :** या संसारात कुठलाही मनुष्य संडास जाण्यासाठी स्वतंत्र सत्तावाला असेल असा जन्मलाच नाही. संडास जाण्यासाठीही स्वतंत्र सत्ता कोणाची नाही. मग दुसरी कोणती सत्ता असेल? हे तर जेव्हा

स्वतःचा मर्जीनुसार थोडेफार होत आहे, तेव्हा मनात मानता की माझ्यामुळेच सर्व काही होत आहे. जेव्हा कधी अडकते ना, तेव्हा कळते.

मी फॉरिन रिटर्न दहा बारा डॉक्टरांना इथे बडौद्यात एकत्र केले होते, त्यांना मी सांगितले. 'संडास जाण्याची स्वतंत्र शक्ती आपली नाही.' यावर त्यांच्यात खळबळ उडाली. पुढे मी सांगितले हे तर कधी (संडास) अडकल्यावर तुम्हाला कळेल. तेव्हा तुम्हाला कोणाची तरी मदत घ्यावी लागेल. म्हणून ही आपली स्वतंत्र शक्ती नाही. हे तर भ्रमाने आपण नैसर्गिक शक्तीला स्वतःची शक्ती मानतो. परसत्तेला स्वतःची शक्ती मानतो, त्याचेच नाव भ्रांती. ही गोष्ट तुम्हाला थोडीफार समजली का? दोन आणे किंवा चार आणे इतकी तरी समजली?

**प्रश्नकर्ता :** हो, समजत आहे.

**दादाश्री :** इतके जरी समजले तरी मार्ग निघेल. हे लोक जे बोलतात की, 'मी एवढे तप केले, एवढे जप केले, उपवास केले.' ही सर्व भ्रांती आहे, तरी पण जग असेच्याअसेच वागत राहील. अहंकार केल्याशिवाय राहणारच नाही. स्वभाव आहे ना?

## कर्ता, नैमित्तिक कर्ता...

**प्रश्नकर्ता :** वास्तवात जर स्वतः कर्ता नाही, तर मग कर्ता कोण आहे? आणि त्याचे स्वरूप काय आहे?

**दादाश्री :** त्याचे असे आहे, नैमित्तिक कर्ता तर स्वतःच आहे. स्वतः स्वतंत्र कर्ता तर नाहीच, परंतु नैमित्तिक कर्ता आहे. म्हणजे पार्लामेंट्री पद्धतीने कर्ता आहे. पार्लामेंट्री पद्धत म्हणजे काय? तर जसे पार्लामेंटमध्ये सगळ्यांचे व्होटिंग होते आणि मग शेवटी स्वतःचे व्होट होते आणि त्या आधारावर तो म्हणतो की हे तर मला करावे लागेल. त्या हिशोबाने कर्ता होतो. अशाप्रकारे योजनेचे सर्जन होते, योजना करणारा स्वतःच आहे. कर्तेपणा केवळ योजनेतच असतो. योजनेत त्याची

सही आहे. परंतु संसारातील लोक हे जाणत नाहीत. ते व्यष्टि कम्प्युटर म्हणजे छोट्या कम्प्युटरसारखे आहे. जसे छोट्या कम्प्युटरमध्ये फीड केलेले निघते आणि मोठ्या कम्प्युटरमध्ये ते फीड होते, अशाप्रकारे ही योजना सर्जन होऊन मोठ्या कम्प्युटरमध्ये जाते. मोठा कम्प्युटर हा समष्टि कम्प्युटर आहे, तो मग त्याचे विसर्जन करतो. म्हणजे या जन्मातील पूर्ण जीवन विसर्जन स्वरूपातच आहे, ज्याचे सर्जन मागच्या जन्मी केलेले असते. ह्या जन्मात जन्मापासून ते मृत्युपर्यंत सर्व विसर्जन स्वरूपातच आहे. स्वतःच्या हातात काहीच नाही आहे, सर्व परसत्तेतच आहे. एकदा योजना झाली की मग सर्व परसत्तेत जाते. परिणामात परसत्तेचाच अमल चालतो. अर्थात परिणाम वेगळा आहे. परिणाम परसत्तेच्या अधीन आहे. तुम्हाला समजले का? ही फार खोल वरची गोष्ट आहे.

## कर्तापदाने कर्मबंधन

**प्रश्नकर्ता :** या कर्मबंधनातून सुटण्यासाठी काय करावे?

**दादाश्री :** हे जे कर्म आहे, ते कर्त्याच्या अधीन आहे. म्हणून कर्ता असेल तरच कर्म होईल. कर्ता नसेल तर कर्म होणार नाही. कर्ता कसे? तर आरोपितभावात जाऊन बसल्यामुळे कर्ता झालात. आपल्या मूळ स्वभावात आलात तर स्वतः कर्ता नाहीच. 'मी केले' असे सांगितले म्हणून कर्ता झाला, म्हणजेच कर्माला आधार दिला. आता जर स्वतः कर्ता झाला नाही, तर कर्म गळून पडणार. निराधार केल्यावर कर्म पडणार. म्हणजे कर्तापण आहे तोपर्यंत कर्म आहे.

*'छूटे देहाध्यास तो नहीं कर्ता तुं कर्म,*
*नहीं भोक्ता तुं तेहनो अे ज धर्मनो मर्म'*

('सुटला देहाध्यास तर नाही कर्ता तू कर्म,
नाही भोक्ता तू त्याचा, हेच धर्माचे मर्म.')

– श्रीमद् राजचंद्र

आता तुम्ही 'मी चंदुलाल आहे' असे मानता. म्हणून सर्व एकाकार होऊन गेले आहे. आत दोन वस्तू वेगळ्याच आहेत. तुम्ही वेगळे आहात आणि चंदुलाल वेगळे आहेत. पण तुम्ही हे जाणत नाही, तोपर्यंत कसे होईल? ज्ञानी पुरुष भेद विज्ञानाने वेगळे करून देतात. मग जेव्हा 'तुम्ही' ('चंदुलाल'पासून) वेगळे होता तेव्हा मग 'तुम्हाला' काहीच करायचे नाही, 'चंदुलाल'च सर्व करत राहील.

# (6) भेदज्ञान कोण करविणार?

## आत्मा-अनात्मायाचे वैज्ञानिक विभाजन

जसे या अंगठीत सोने आणि तांबे दोन्ही मिसळलेले आहेत, तुम्ही गावात जाऊन कोणालाही सांगितले की, 'भाऊ, सोने आणि तांबे वेगवेगळे करून द्या ना' तर काय कोणीही हे काम करू शकेल? कोण करणार?

**प्रश्नकर्ता :** सोनारच करू शकेल.

**दादाश्री :** ज्याचे हे काम आहे, जो या कामात एक्सपर्ट आहे, तोच सोने आणि तांबे दोन्ही वेगळे करून देईल. शंभरच्या शंभर टक्के सोने वेगळे करेल, कारण तो दोन्हींचे गुणधर्म जाणतो, की सोन्याचे गुणधर्म असे आहेत आणि तांब्याचे गुणधर्म असे आहेत. त्याच प्रकारे ज्ञानी पुरुष आत्म्याचे गुणधर्म जाणतात आणि अनात्म्याचे गुणधर्मही जाणतात.

जसे अंगठीमध्ये सोने आणि तांब्याचे 'मिश्रण' असेल तर त्याला वेगळे करता येते. जर सोने आणि तांबे दोन्ही कंपाऊंड स्वरूप (संयुगा) होऊन गेले असते तर त्यांना वेगळे करता आले नसते, कारण त्यामुळे वेगळ्याच प्रकारचे गुणधर्म तयार होतात. तसेच जीवाच्या आत चेतन आणि अचेतन यांचे मिश्रण आहे, पण ते कंपाऊंड स्वरूप झालेले नाही. म्हणून परत आपण स्वत:च्या स्वभावाला प्राप्त करू शकतात. कंपाऊंड झाले असते तर कळलेच नसते. चेतनचा गुणधर्म पण कळला नसता आणि अचेतनचा गुणधर्म पण कळला नसता आणि तिसराच गुणधर्म

उत्पन्न झाला असता. पण तसे झालेले नाही. केवळ मिश्रण झाले आहे. म्हणून ज्ञानी पुरुषाने हे वेगळे करून दिले तर आत्म्याची ओळख होईल.

## ज्ञानविधी काय आहे?

**प्रश्नकर्ता :** आपली ज्ञानविधी काय आहे?

**दादाश्री :** ज्ञानविधी म्हणजे तर सेपरेशन (वेगळे) करणे. पुद्‌गल (अनात्मा) आणि आत्म्याचे सेपरेशन करणे! शुद्ध चेतन आणि पुद्‌गल दोन्हीचे सेपरेशन.

**प्रश्नकर्ता :** हा सिद्धांत तर बरोबर आहे, पण त्याची पद्धती काय आहे?

**दादाश्री :** याच्यात देणेघेणे असे काही होत नाही, केवळ इथे बसून जसे आहे तसे बोलण्याची आवश्यकता आहे ('मी कोण आहे' याची ओळख, याचे ज्ञान प्राप्त करणे. दोन तासाचा ज्ञानप्रयोग आहे. त्यात अठ्ठेचाळीस मिनिट आत्मा-अनात्म्याचा भेद करणारी भेदविज्ञानाची वाक्य बोलली जातात, जी सगळ्यांनी बोलायची असतात. त्या नंतर एक तासात पाच आज्ञा उदाहरणे देऊन सविस्तर समजावल्या जातात, की आता बाकीचे जीवन कसे व्यतीत केले पाहिजे की ज्यामुळे नवीन कर्म बांधले जाणार नाहीत आणि जुनी कर्मे पूर्णपणे संपतील, आणि त्याचबरोबर 'मी शुद्धात्मा आहे' याचे लक्ष्य कायम राहील. (ज्ञानविधीत हे सर्व सविस्तर समजावण्यात येते).

## आवश्यकता गुरूची? ज्ञानीची?

**प्रश्नकर्ता :** दादाजींना भेटण्यापूर्वी कोणाला तरी गुरू मानले असेल तर? तर त्यांचे काय करायचे?

**दादाश्री :** त्यांच्याकडे जायचे. आणि जर जायचे नसेल तर नका जाऊ, तसे जाणे आवश्यकही नाही. तुम्ही जाऊ इच्छित असाल तर जा,

नाही तर नका जाऊ. त्यांना दु:ख होऊ नये, म्हणून जायला हवे. तुम्ही विनय राखला पाहिजे. इथे 'आत्मज्ञान' घेतवेळी मला कोणी विचारेल की, 'आता मी गुरूंना सोडून देऊ?' तर मी सांगेन, 'नका सोडू, अहो, त्या गुरूंच्या प्रतापामुळे तर तुम्ही इथपर्यंत पोहोचू शकलात.' गुरूमुळे मनुष्य काही मर्यादांमध्ये राहू शकतो. गुरू नाही तर मर्यादाही राहणार नाही. आणि गुरूंना सांगितले पाहिजे, 'मला ज्ञानी पुरुष भेटले आहेत. मी त्यांचे दर्शन करण्यासाठी जात आहे.' काही लोक तर आपल्या गुरूंना पण माझ्याजवळ घेऊन येतात, कारण गुरूंनां पण मोक्ष हवा असतो ना! संसाराचे ज्ञान पण गुरूशिवाय होत नाही आणि मोक्षाचे ज्ञान पण गुरूशिवाय होत नाही. व्यवहाराचे गुरू 'व्यवहारासाठी' आहेत आणि ज्ञानी पुरुष 'निश्चयासाठी' आहेत. व्यवहार रिलेटिव्ह आहे आणि निश्चय रियल आहे. रिलेटिव्हसाठी गुरू हवेत आणि रियलसाठी ज्ञानी पुरुष हवेत.

# (7) मोक्षाचे स्वरूप काय?

## ध्येय केवळ हेच असायला हवे

**प्रश्नकर्ता :** मनुष्याचे ध्येय काय असायला हवे?

**दादाश्री :** मोक्षाला जाण्याचेच! हेच ध्येय असायला हवे. तुम्हालाही मोक्षाला जायचे आहे ना? कुठपर्यंत भटकायचे? अनंत जन्मांपासून भटक भटक... भटकण्यात काही बाकी सोडले नाही ना! जनावराच्या गतीमध्ये, मनुष्यगतीमध्ये, देवगतीमध्ये, सगळ्या ठिकाणी भटकतच राहिले आहात. कशामुळे भटकणे झाले? कारण 'मी कोण आहे' हेच जाणले नाही. स्वत:चे स्वरूपच ओळखले नाही. स्वत:चे स्वरूप ओळखले पाहिजे. 'स्वत: कोण आहे' याची ओळख करायला नको का? इतके फिरून पण तुम्ही ते ओळखले नाही? केवळ पैसे कमावण्याच्या मागे पडला आहात? मोक्षासाठीही थोडेफार करायला हवे की नको?

**प्रश्नकर्ता :** करायला पाहिजे.

**दादाश्री :** म्हणजे स्वतंत्र होण्याची गरज आहे ना? असे परावलंबी कुठपर्यंत राहणार?

**प्रश्नकर्ता :** स्वतंत्र होण्याची गरज नाही, पण स्वतंत्र होण्याची गरज समजण्याची आवश्यकता आहे, असे मला वाटते.

**दादाश्री :** हो, अशा समजेचीच आवश्यकता आहे. ही समज आपल्याला आली तर खूप झाले, मग जरी स्वतंत्र होऊ शकलो नाही तरीही. स्वतंत्र होऊ शकतो की नाही ही त्यानंतरची गोष्ट आहे, परंतु समजेची आवश्यकता तर आहेच ना! आधी समज प्राप्त झाली, तरी खूप झाले.

## 'स्वभावात' येण्यासाठी मेहनत नको

मोक्ष म्हणजे आपल्या स्वभावात येणे आणि संसार म्हणजे आपल्या विशेषभावात जाणे. म्हणजे सोपे काय? तर स्वभावात राहणे हेच! अर्थात मोक्ष कठीण नसतो. संसार नेहमीच कठीण राहिला आहे. मोक्ष तर खिचडी बनवण्यापेक्षाही सोपा आहे. खिचडी बनवण्यासाठी तर लाकूड आणावे लागते, डाळ-तांदूळ आणावे लागतात, पातेले आणावे लागते, पाणी आणावे लागते तेव्हा मग खिचडी बनते. परंतु मोक्ष तर खिचडी बनवण्यापेक्षाही सोपा आहे, पण मोक्षदाता ज्ञानी भेटले पाहिजेत. नाही तर मोक्ष कधीही मिळू शकणार नाही. करोडो जन्म घेतल्यानंतर सुद्धा मिळणार नाही. अनंत जन्म झालेलेच आहेत ना?

## मेहनतीने मोक्षप्राप्ती नाही!

हे जे आम्ही सांगतो ना की, आमच्याकडे येऊन मोक्ष घेऊन जा, तेव्हा लोक मनात विचार करतात की 'असा दिला गेलेला मोक्ष काय कामाचा, स्वत: मेहनत केल्याशिवाय?!' तर भाऊ, मेहनत करून मिळवा. बघा, त्याची समज किती चांगली (!) आहे? अहो, मेहनतीने काहीसुद्धा मिळणार नाही. मेहनतीने कधी कोणाला मोक्ष मिळालेला नाही.

**प्रश्नकर्ता :** मोक्ष दिला किंवा घेतला जाऊ शकतो का?

**दादाश्री :** तो देण्या-घेण्याचा नसतोच. हे तर नैमित्तिक आहे. तुम्ही मला भेटलात, हे निमित्त झाले, निमित्ताचीच गरज आहे. खरे तर, कोणी देणाराही नाही आणि कोणी घेणाराही नाही. देणारा कोणाला म्हटले जाते? जो स्वत:ची वस्तू आपल्याला देतो त्याला देणारा म्हणतात. पण मोक्ष तर तुमच्या घरातच आहे. आम्हाला तर तो केवळ तुम्हाला दाखवायचाच आहे, रियलाइज करून द्यायचा आहे, म्हणजे देण्या-घेण्याचे असे काही घडतच नाही. आम्ही तर केवळ निमित्त आहोत.

## मोक्ष म्हणजे सनातन सुख

**प्रश्नकर्ता :** मोक्ष मिळवून करायचे काय?

**दादाश्री :** काही लोक मला भेटल्यावर सांगतात की, 'मला मोक्ष नको.' तेव्हा मी सांगतो, 'भाऊ, तुम्हाला मोक्षाची गरज नाही, पण सुख तर हवे की नको? की दु:ख आवडते तुम्हाला?' तेव्हा सांगतात, 'नाही, सुख तर हवे.' मग मी विचारतो, 'सुख थोडेफार कमी असेल तर चालेल का?' तेव्हा म्हणतात 'नाही, सुख तर पूर्ण हवे' तेव्हा मी सांगतो, 'मग आपण सुखा बद्दलच बोलूया. मोक्षाचे राहू द्या.' मोक्ष काय आहे, हे लोकांना समजतच नाही. शब्दात बोलतात इतकेच. लोक असे समजतात की मोक्ष नावाची एखादी जागा आहे आणि तिथे गेल्यावर आपल्याला मोक्षाची मजा येते! पण हे तसे नाही.

## मोक्ष, दोन स्टेजमध्ये

**प्रश्नकर्ता :** सामान्यपणे मोक्षाचा अर्थ आम्ही जन्म-मरणातून मुक्ती असा करतो.

**दादाश्री :** हो, हे बरोबर आहे. पण जी अंतिम मुक्ती आहे, ती सेकन्डरी स्टेज आहे. पहिला मोक्ष म्हणजे संसारी दु:खांचा अभाव

अनुभवास येतो. संसारातील दु:खात पण दु:ख वाटत नाही, उपाधीमध्ये पण समाधी राहते, हा पहिला मोक्ष. आणि मग हा देह सुटल्यावर आत्यंतिक मोक्ष आहे. पण पहिला मोक्ष तर इथेच झाला पाहिजे. माझा मोक्ष झालाच आहे ना! संसारात राहूनही संसार स्पर्श करत नाही, असा मोक्ष व्हायला हवा. या अक्रम विज्ञानात हे शक्य होऊ शकते.

## जिवंतपणीच मुक्ती

**प्रश्नकर्ता :** ही मुक्ती किंवा मोक्ष आहे, ती जिवंतपणी मुक्ती आहे की मरण्यानंतरची मुक्ती आहे ?

**दादाश्री :** मरणानंतर मिळालेली मुक्ती काय कामाची ? मरणानंतर मुक्ती मिळणार, असे सांगून लोकांना फसवतात. अरे, मला इथेच काही तरी दाखव ना! स्वाद तर घेऊ दे थोडा, काही पुरावा तर दाखव. तिथे मोक्ष मिळेल, याची काय खात्री ? अशा उधार मोक्षाचा आम्हाला काय फायदा ? उधारीत बरकत नसते. म्हणून कॅश (नकद) चांगली. आपल्याला तर इथे जिवंतपणीच मुक्ती मिळायला हवी. जशी त्या जनक राजाची मुक्ती, तुम्ही ऐकली आहे की नाही ?

**प्रश्नकर्ता :** ऐकली आहे.

# (8) अक्रम मार्ग काय आहे ?

## अक्रम ज्ञानाने अनोखी सिद्धी

**प्रश्नकर्ता :** पण या संसारात राहून आत्मज्ञान मिळू शकते का ?

**दादाश्री :** हो, असा मार्ग आहे. संसारात राहून इतकेच नाही, पण पत्नीसोबत राहूनही आत्मज्ञान मिळू शकते, असे आहे. केवळ संसारात राहायचे इतकेच नाही, पण मुला-मुलींची लग्ने करून, सगळी कामे करतानाही आत्मज्ञान होऊ शकते. मी संसारात राहूनच तुम्हाला हे

करून देत आहे. संसारात, म्हणजे सिनेमा बघायला जाणे, वगैरे सगळीच सूट देत आहे. मुलामुलींची लग्ने करा, चांगले कपडे घालून लग्ने करा. मग यापेक्षा अजून काय खात्री पाहिजे ?

**प्रश्नकर्ता :** एवढी सूट मिळाल्यावर नक्कीच आत्म्यात राहू शकतो.

**दादाश्री :** सगळी सूट! हा अपवाद मार्ग आहे. तुम्हाला काही मेहनत करायची नाही. तुम्हाला आत्मा पण हातात देऊ, मग त्यानंतर तुम्ही आत्मरमणतेत रमून जा आणि या लिफ्टमध्ये बसून राहा. आणखी काहीच करायचे नाही. नंतर तुम्हाला कर्मबंधन होणारच नाहीत, एका जन्माचेच कर्म बांधले जातील, तेसुद्धा माझ्या आज्ञा पालन करण्यापुरतेच. आमच्या आज्ञेत राहणे हे जरूरी आहे कारण लिफ्टमध्ये बसते वेळी जर कधी इकडेतिकडे हात केला तर अडचणीत पडू शकता ना!

**प्रश्नकर्ता :** म्हणजे पुढचा जन्म नक्की असणार ?

**दादाश्री :** मागचा जन्म सुद्धा होता आणि आता पुढचा जन्म सुद्धा आहे, पण हे ज्ञान असे आहे की आता एक-दोन जन्मच बाकी राहिलेत. प्रथम अज्ञानापासून मुक्ती होते. मग एक-दोन जन्मात शेवटची (अंतिम) मुक्ती मिळेल. एक जन्म तर शेष राहते, असा हा काळ आहे.

तुम्ही एक दिवस माझ्याकडे या. आम्ही एक दिवस ठरवू तेव्हा तुम्हाला यायचे आहे. त्या दिवशी आम्ही सगळ्यांची रस्सी मागून कापतो (स्वरूपाच्या अज्ञानरूपी रस्सीचे बंधन दूर करतो). रोजच कापायचे नसते. रोज तर सगळ्या सत्संगाच्या गोष्टी करतो, परंतु एक दिवस ठरवून त्या दिवशी ब्लेडने अशी रस्सी कापून देतो. (ज्ञानविधीने स्वरूपज्ञान प्राप्त करवून देतो) दुसरे काही नाही. मग लगेचच तुम्ही समजून जाता की आता सर्व मोकळे झाले! हा अनुभव झाल्यावर लोक त्वरितच सांगतात की मुक्त झालो. अर्थात मुक्त झाला आहे, असे भान झाले पाहिजे. मुक्त होणे ह्या काही थापा नाहीत. म्हणजे आम्ही तुम्हाला मुक्त करतो.

ज्या दिवशी आम्ही हे 'ज्ञान' देतो त्यादिवशी काय होते? ज्ञानाग्निने त्यांची जी कर्मे आहेत, ती भस्मसात होऊन जातात. दोन प्रकारची कर्मे भस्मसात होतात आणि एका प्रकारची कर्मे बाकी राहतात. जी कर्मे वाफ स्वरूपात आहेत, त्यांचा नाश होऊन जातो आणि जी कर्मे पाणी स्वरूप आहेत, त्यांचा पण नाश होतो, पण जी कर्मे बर्फ स्वरूप आहेत, ती मात्र भोगावीच लागतात. कारण ती गोठलेली आहेत, आणि ती कर्मे फळ देण्यासाठी तयार झालेली आहेत, ती सोडत नाहीत. पण पाणी आणि वाफस्वरूप जी कर्मे आहेत, त्यांना ज्ञानाग्नि उडवून लावतो. म्हणून ज्ञान मिळताच लोक एकदम हलके होऊन जातात, त्यांची जागृती एकदम वाढते. कारण जोपर्यंत कर्मे भस्मसात होत नाहीत तोपर्यंत माणसाची जागृती वाढतच नाही. जी बर्फस्वरूप कर्म आहेत ती तर आपल्याला अवश्य भोगावीच लागतात. आणि ती पण सरळपणे कशी भोगायची, त्याचे सर्व उपाय आम्ही सांगितले आहे की, 'भाऊ, 'दादा भगवानांचा असीम जय जयकार हो' बोला, त्रिमंत्र बोला, नऊ कलमे बोला.'

आम्ही ज्ञान देतो, त्याने कर्मे भस्मसात होतात आणि त्यावेळेस बरीच आवरणे तुटतात. तेव्हा भगवंताची कृपा झाल्याबरोबर लगेच तो स्वतः जागृत होतो. ती जागृती मग जात नाही, जागल्यानंतर जागृती जात नाही. निरंतर जागृत राहू शकतो, म्हणजे निरंतर प्रतिती राहणारच. प्रतिती केव्हा राहते? जागृती असेल तर प्रतिती राहते. प्रथम जागृती, नंतर प्रतिती. अनुभव, लक्ष्य आणि प्रतिती हे तिन्ही राहतात. प्रतिती कायमची राहील. लक्ष्य तर काही काही वेळेस राहील. कधी धंद्यात किंवा काही कामाला लागलात की मग लक्ष्य चुकेल आणि काम संपल्यावर ते परत येईल. आणि अनुभव तर केव्हा होईल? तर जेव्हा सर्व कामापासून मोकळे होऊन एकांतात बसले असाल तेव्हा (आत्म) अनुभवाचा स्वाद येईल. खरे तर, अनुभव वाढतच राहतो. कारण पूर्वी चंदुलाल काय होते आणि आज चंदुलाल काय आहे, हे लक्षात येते. तर हे परिवर्तन कसे

घडले ? आत्म अनुभवाने. पूर्वी देहाध्यासाचा अनुभव होता आणि आता हा आत्म-अनुभव आहे.

**प्रश्नकर्ता :** आत्म्याचा अनुभव झाल्यावर काय होत असते ?

**दादाश्री :** आत्म्याचा अनुभव झाला, म्हणजे देहाध्यास सुटला. देहाध्यास सुटला, म्हणजे कर्मबंधन होण्याचे थांबले, मग आणखी काय हवे ?

## आत्मा-अनात्म्यामध्ये भेदरेखा!

हे अक्रम विज्ञान आहे, म्हणून इतक्या लवकर सम्यक्त्व (सम्यक्त्व=शुद्धात्म्याचे लक्ष असलेली सम्यक्दृष्टी) होते. नाही तर सध्या क्रमिक मार्गात सम्यक्त्व होऊ शकेल असे शक्यच नाही. हे अक्रम विज्ञान खूप उच्च कोटीचे विज्ञान आहे. आम्ही आत्मा आणि अनात्म्यामध्ये, म्हणजेच आपली आणि परकी वस्तू, या दोघांचे विभाजन करून देतो. 'हा' हिस्सा आपला आणि 'हा' हिस्सा आपला नाही. आणि मध्ये लाईन ऑफ डिमार्केशन-भेदरेखा लावून देतो. त्यानंतर मग शेजारच्या शेतातील भेंडी तुम्ही खाऊ शकत नाही ना ?

## मार्ग-'क्रम' आणि 'अक्रम'

तीर्थंकरांचे जे ज्ञान आहे ते क्रमिक ज्ञान आहे. क्रमिक म्हणजे पायरी पायरीने वर चढायचे. जसजसे परिग्रह कमी करत जाणार, तसतसा मोक्षाच्या जवळ पोहोचणार. ते सुद्धा बऱ्याच काळानंतर पोहोचणार. आणि हे अक्रम विज्ञान म्हणजे काय ? पायरी चढायची नाही, सरळ लिफ्टमध्ये बसायचे आणि बाराव्या मजल्यावर चढायचे, असा हा लिफ्टचा मार्ग निघाला आहे. जे ह्या लिफ्टमध्ये बसले, त्यांचे कल्याण झाले, मी तर निमित्त आहे. या लिफ्टमध्ये जे बसले, त्यांचा उपाय निघाला ना! उपाय तर निघायलाच हवा ना ? शिवाय मोक्षाला जाणाऱ्या लिफ्टमध्येच

बसलेले आहात याची खात्री तर असायला हवी की नको ? याची खात्री म्हणजे क्रोध-मान-माया-लोभ होत नाही, आर्तध्यान-रौद्रध्यान होत नाही. म्हणजे पूर्ण काम झाले ना ?

## जो 'मला' भेटला तोच अधिकारी !

**प्रश्नकर्ता :** हा मार्ग इतका सोपा आहे, तर मग काही अधिकार (पात्रता) वगैरे आहे की नाही, हे पाहायचेच नाही ? प्रत्येकासाठी हे संभव आहे ?

**दादाश्री :** लोक मला विचारतात की, 'मी अधिकारी आहे का ?' तेव्हा मी सांगतो, 'मला भेटलास, म्हणून तू अधिकारी आहेस.' हे भेटणे म्हणजे त्याच्या मागे सायन्टिफिक सरकमस्टेन्शियल एविडन्सेस आहेत, म्हणून मला जो कोणी भेटला, त्याला मी अधिकारी मानतो. जे भेटले नाहीत ते अधिकारी नाहीत. हे कशाच्या आधारावर भेटतात ? तर, अधिकारी आहेत या आधारावरच ते मला भेटतात. मला भेटल्यावर पण जर त्याला प्राप्ती झाली नाही, तर त्याचे कारण त्याचे अंतराय कर्म आहे.

## क्रमिकमार्गात 'करायचे आणि अक्रमात...

एकदा, एका भाऊनी मला प्रश्न केला की क्रम आणि अक्रममध्ये फरक काय आहे ? तेव्हा मी सांगितले की, क्रम म्हणजे ते सर्व सांगतात की हे वाईट सोडा आणि चांगले करा. नेहमी सगळ्यांनी हेच सांगितले, त्याचे नाव क्रमिक मार्ग. क्रम म्हणजे सर्व सोडायला सांगणे, कपट-लोभ सोडा आणि चांगले करा. हेच तुम्ही आजपर्यंत पाहिले आहे ना ? आणि हे अक्रम म्हणजे, करायचे नाही, करोमि-करोसि-करोति नाही. खिसा कापला गेला तर अक्रममध्ये सांगणार, 'त्याने कापला नाही आणि माझा कापला गेला नाही' आणि क्रममध्ये असे सांगतात की, 'त्याने कापले आणि माझे कापले गेले.'

हे अक्रम विज्ञान लॉटरीसारखे आहे. लॉटरीमध्ये बक्षिस मिळते,

त्यात त्याने काही श्रम केले होते का? रूपया तर त्याने पण दिला होता आणि इतरांनी सुद्धा दिला होता, पण त्याचे चालले. असे हे अक्रम विज्ञान, लगेचच मोक्ष देते, रोखच!

## अक्रम मार्गामुळे परिवर्तन!

अक्रम विज्ञान तर खूपच अद्भुत म्हटले जाते. इथे 'आत्मज्ञान' घेतल्यानंतर लगेच दुसऱ्या दिवसापासून मनुष्यात परिवर्तन होते. हे ऐकताच लोक ह्या विज्ञानाचा स्वीकार करतात आणि आकर्षित होऊन इथे येतात.

## अक्रम मार्ग, विश्वभरात

हा संयोग तर खूपच उच्च कोटीचा जुळून आला आहे. असे दुसऱ्या कुठल्याही जागी झालेले नाही. एकच मनुष्य, 'दादाश्री' एकटेच कार्य करू शकले, दुसरे कोणी करू शकणार नाहीत.

**प्रश्नकर्ता :** नंतर पण दादाजींची कृपा राहील ना? आपल्या नंतर काय होईल?

**दादाश्री :** हा मार्ग तर चालू राहणार. माझी इच्छा आहे की कोणी तरी तयार व्हावे, नंतर मार्ग चालवणारा पाहिजे ना?

**प्रश्नकर्ता :** पाहिजे.

**दादाश्री :** माझी इच्छा पूर्ण होईल.

**प्रश्नकर्ता :** 'अक्रम विज्ञान' जर चालू राहिले, तर त्या निमित्ता द्वारेच चालू राहील?

**दादाश्री :** 'अक्रम विज्ञान'च चालू राहणार. अक्रम विज्ञान जर अजून वर्ष दोन वर्ष असेच चालू राहिले तर साऱ्या दुनियेत ह्याच्याच गोष्टी फार लांब लांबपर्यंत पोहोचतील. कारण जशी खोटी गोष्ट डोक्यावर चढून बोलते. त्याच प्रकारे खरी गोष्ट पण डोक्यावर चढून बोलते.

खऱ्या गोष्टींचा अमल उशीरा होतो आणि खोट्या गोष्टींचा अमल लवकर होतो.

## अक्रम द्वारा स्त्रीचा पण मोक्ष

लोक म्हणतात की मोक्ष पुरुषाचाच होतो, स्त्रियांचा मोक्ष होत नाही. यावर मी त्यांना सांगतो स्त्रियांचा पण मोक्ष होतो. का नाही होणार? स्त्रियांची कपटाची आणि मोहाची ग्रंथी खूप मोठी असते, सुरणाएवढी मोठी असते. पुरुषांची ग्रंथी छोटी असते.

स्त्री पण मोक्षाला जाणार. जरी सर्व जण नाकारत असतील तरी पण स्त्री मोक्षासाठी लायक आहे. कारण ती आत्मा आहे आणि पुरुषांच्या संपर्कात आली आहे, म्हणून तिचा पण मार्ग निघेल, पण स्त्री प्रकृतीमध्ये मोह बळकट असल्यामुळे जास्त वेळ लागेल!

## काम साधून घ्या

आपले (मोक्षाचे) काम करून घ्या, जेव्हा गरज असेल तेव्हा. असेही नाही की तुम्हाला इथे यायलाच हवे. तुम्हाला ठीक वाटले तर या, आणि संसार आवडत असेल, पटत असेल तर तो व्यापार चालू ठेवा. तुम्ही असेच करावे असे आम्ही म्हणणार नाही. आणि आम्ही तुम्हाला पत्रही लिहीणार नाही. तुम्ही इथे आला आहात तर आम्ही तुम्हाला सांगू की, 'भाऊ, लाभ मिळवा.' इतकेच सांगू. हजारो वर्षात असे विज्ञान प्रकट झालेले नाही. म्हणून मी सांगतो की नंतर जे काही व्हायचे असेल ते होवो, पण हे काम करून घेण्यासारखे आहे.

# (9) 'ज्ञानी पुरुष' कोण?

## संत पुरुष : ज्ञानी पुरुष

**प्रश्नकर्ता :** हे जे सगळे संत होऊन गेले, त्यांच्यात आणि ज्ञानीमध्ये किती अंतर आहे?

**दादाश्री :** संत कोणाला म्हणायचे की जे वाईट गोष्टी सोडवतात आणि चांगल्या गोष्टी शिकवतात. वाईट करणे सोडवतात आणि चांगले करणे शिकवतात, त्यांना संत म्हणायचे.

**प्रश्नकर्ता :** म्हणजे पापकर्मांपासून वाचवतात ते संत?

**दादाश्री :** हो, पापकर्मांपासून वाचवतात ते संत पण पाप-पुण्य, दोन्हींपासून वाचवतात, त्यांचे नाव ज्ञानी पुरुष.

संत पुरुष सत्य मार्गावर चढवतात आणि ज्ञानी पुरुष मुक्ती देतात. संताना पथिक म्हणतात. पथिक म्हणजे ते स्वतः चालतात आणि दुसऱ्या पथिकांनाही म्हणतात, 'चला तुम्ही माझ्यासोबत.' आणि ज्ञानी पुरुषाला तर शेवटचे स्टेशन म्हणतात, तिथे तर तुमचे (मोक्षाचे) कामच होऊन जाते.

खरा, अगदी खरा संत कोण? जो ममतारहित असेल तो. जे दुसरे आहेत, ते थोडेफार ममतावाले असतात. आणि सच्चा ज्ञानी कोण? ज्याला अहंकार आणि ममता दोन्ही नसतात. म्हणून संतांना ज्ञानी पुरुष म्हणता येत नाही. संतांना आत्मज्ञान नसते. हे संत पण जेव्हा ज्ञानी पुरुषांना भेटतील तेव्हा त्यांनाही मार्ग मिळेल. संतांनाही याची आवश्यकता आहे. सगळ्यांना इथे यावे लागेल, सुटकाच नाही! प्रत्येकाची इच्छा हीच असते.

ज्ञानी पुरुष यांना जगाचे आश्चर्य म्हणतात. ज्ञानी पुरुष म्हणजे प्रकट दिवा.

## ज्ञानी पुरुषांची ओळख

**प्रश्नकर्ता :** ज्ञानी पुरुषाला कसे ओळखायचे?

**दादाश्री :** कसे ओळखायचे? ज्ञानी पुरुष तर काही न करताच ओळखले जातील असे असतात. त्यांचा सुगंधच ओळखला जाईल असा असतो. त्यांचे वातावरण काही वेगळेच असते. त्यांची वाणी पण वेगळीच

असते. त्यांच्या शब्दातून कळते. अरे, त्यांचे डोळे बघताच कळते. ज्ञानींकडे खूप विश्वसनीयता असते, जबरदस्त विश्वसनीयता. आणि त्यांचा प्रत्येक शब्द शास्त्ररूप असतो, जर समजले तर! त्यांची वाणी-वर्तन आणि विनय मनोहर असतात, मनाचे हरण करणारे असतात. अशी बरीचशी लक्षणे असतात.

ज्ञानी पुरुषांत बुद्धी नावालाही नसते, ते अबुध असतात. किंचितमात्र बुद्धी नसेल असे किती लोक असतील? ज्ञानी तर कधीकाळीच जन्माला येतात, आणि तेव्हा लोकांचे कल्याण होऊन जाते. तेव्हा लाखो मनुष्य (भवसागर) तरून पार होऊन जातात. ज्ञानी पुरुष अहंकाररहित असतात. जरा सुद्धा अहंकार नसतो. तसे तर या संसार अहंकाररहित कुणीच नसतो. मात्र ज्ञानी पुरुषच अहंकाररहित असतात.

ज्ञानी पुरुष तर हजारो वर्षात एखादेच असतात. बाकी, संत, शास्त्रज्ञ तर अनेक असतात, आपल्या इथे शास्त्रांचे ज्ञानी आहेत पण आत्म्याचे ज्ञानी नाहीत. जे आत्मज्ञानी असतात ना, ते तर परम सुखी असतात, त्यांना किंचितमात्र दु:ख नसते. म्हणून तिथे तुमचे कल्याण होऊन जाईल. जे स्वत:चे कल्याण करून बसलेत, तेच तुमचे कल्याण करू शकतात. जे तरले आहेत तेच आम्हाला तारू शकतात. नाही तर जो स्वत:च बुडत असतो तो इतरांना कधीच तारू शकणार नाही.

## (10) 'दादा भगवान' कोण?

### 'मी' आणि 'दादा भगवान' एक नाहीत

**प्रश्नकर्ता :** तर तुम्ही स्वत:ला भगवान कशाप्रकारे म्हणवता?

**दादाश्री :** मी स्वत: भगवान नाही. भगवानांना, 'दादा भगवान'यांना तर मी पण नमस्कार करतो. मी स्वत: तीनशे छप्पन डिग्रीवर आहे, आणि 'दादा भगवान' तीनशे साठ डिग्रीवर आहेत. माझी चार डिग्री कमी आहे. म्हणून मी 'दादा भगवानांना' नमस्कार करतो.

**प्रश्नकर्ता :** ते कशासाठी ?

**दादाश्री :** कारण मला चार डिग्री पूर्ण करायच्या आहेत. मलाही पूर्ण तर कराव्या लागतील ना ? चार डिग्री कमी राहिली, नापास झालो, पण पास झाल्याशिवाय सुटका आहे का ?

**प्रश्नकर्ता :** आपल्याला भगवान व्हायचा मोह आहे का ?

**दादाश्री :** मला तर भगवान होणे खूप ओझे वाटते. मी तर लघुतम पुरुष आहे. या दुनियेत माझ्या इतका कोणी लघु नाही, इतका मी लघुतम पुरुष आहे. भगवान होणे हे मला ओझे वाटते, उलट शरम वाटते.

**प्रश्नकर्ता :** भगवान व्हायचे नसेल तर मग या चार डिग्री पूर्ण करायचा पुरुषार्थ कशाला करायचा ?

**दादाश्री :** ते तर मोक्षाला जाण्यासाठी, मला भगवान होऊन काय करायचे आहे ? भगवान तर, भगवत् गुण धारण करतात, ते सर्व भगवान असतात. 'भगवान' शब्द विशेषण आहे. कोणीही मनुष्य, ज्याच्यात असे गुण असतील त्याला लोक भगवान म्हणतातच.

## येथे प्रकट झाले, 'चौदालोकाचे' नाथ!

**प्रश्नकर्ता :** 'दादा भगवान' हा शब्दप्रयोग कोणासाठी केला गेला आहे ?

**दादाश्री :** 'दादा भगवान' यांच्यासाठी ! माझ्यासाठी नाही, मी तर ज्ञानी पुरुष आहे.

**प्रश्नकर्ता :** कोणते भगवान ?

**दादाश्री :** 'दादा भगवान', ते 'चौदालोकाचे' नाथ आहेत. ते तुमच्यातही आहेत, पण तुमच्यात प्रकट झालेले नाहीत. तुमच्यात अव्यक्त रूपात आहेत

आणि इथे व्यक्त झाले आहेत. व्यक्त झाले ते फळ देणारे असतात. एकदा जरी त्यांचे नाव घेतले तरी काम होऊन जाईल, असे आहे. पण ओळखून बोललो तर कल्याण होईल. आणि सांसारिक गोष्टींची काही अडचण असेल तर ती पण दूर होईल. पण त्यात लोभ करू नका आणि लोभ केला तर अंतच येणार नाही. तुम्हाला समजले 'दादा भगवान' काय आहेत ते?

हे दिसत आहे ते 'दादा भगवान' नाहीत. हे जे दिसतात, त्यांना तुम्ही 'दादा भगवान' समजत असाल ना? पण हे दिसणारे तर भादरणचे पटेल आहेत. मी 'ज्ञानी पुरुष' आहे आणि 'दादा भगवान' तर आत बसले आहेत, आत प्रकट झालेत आहेत ते 'दादा भगवान' आहेत. 'चौदालोकाचे' नाथ प्रकट झालेत. त्यांना मी स्वतः पाहिले, स्वतः अनुभवले आहे. म्हणून मी गॅरंटीने सांगतो की ते आत प्रकट झाले आहेत.

आणि हे कोण बोलत आहे? तर 'टेपरेकार्डर' बोलत आहे. कारण 'दादा भगवानां'मध्ये बोलण्याची शक्ती नाही. आणि हे 'पटेल' तर 'टेपरेकॉर्डर'च्या आधारावर बोलतात. कारण 'भगवान' आणि 'पटेल' दोन्ही वेगळे झाले, म्हणून तिथे अहंकार करू शकत नाही. हा टेपरेकार्डर बोलतो, त्याचा मी ज्ञाता-द्रष्टा राहतो. तुमचा पण टेपरेकार्डर बोलतो. पण तुमच्या मनात 'मी बोलतो' असा गर्वरस (अहंकार) उत्पन्न होतो. बाकी, आम्हाला सुद्धा 'दादा भगवान'यांना नमस्कार करावा लागतो. आमचा दादा भगवानांबरोबर वेगळेपणा (भिन्नता)चा व्यवहार आहे. व्यवहारच वेगळेपणाचा आहे. पण लोक असे समजतात की हे स्वतःच दादा भगवान आहेत. नाही, स्वतः दादा भगवान कसे होऊ शकतो? हे तर पटेल आहेत, भादरणच गावचे.

## (11) 'अक्रम मार्ग' चालूच आहे

## मागे ज्ञानींची वंशावळी

आम्ही आमच्या नंतर ज्ञानींची वंशावळी सोडून जाऊ. आमचे

उत्तराधिकारी सोडून जाऊ आणि त्यानंतर ज्ञानींची लिंक चालू राहील. म्हणून सजीव मूर्ती शोधा. त्याशिवाय मार्ग निघणार नाही.

मी तर काही लोकांना आपल्या हाताने सिद्धी प्रदान करणार आहे. नंतर कोणी हवे की नको? नंतर लोकांना मार्ग तर हवा ना?

## ज्याला जग स्वीकारणार, त्याचेच चालेल

**प्रश्नकर्ता :** तुम्ही म्हणता की माझ्या मागे चाळीस-पन्नास हजार रडणारे असतील पण शिष्य एकही नसणार. म्हणजे तुम्ही नक्की काय सांगू इच्छिता?

**दादाश्री :** माझा शिष्य कोणीही नसणार. ही काही गादी नाही. गादी असेल तर वारस असेल ना. मग कोणी नातेवाईकांच्या रूपाने वारस बनायला येतील. इथे तर जो स्वीकार्य असेल, त्याचेच चालेल. जो सगळ्यांचा शिष्य बनेल त्याचे काम होईल. इथे तर लोक ज्याचा स्वीकार करतील त्याचेच चालेल. जो लघुतम असेल, त्याला जग स्वीकारेल.

# ( 12 ) आत्मदृष्टी झाल्यानंतर...

## आत्मप्राप्तिचे लक्षण!

'ज्ञान' मिळण्याआधी तुम्ही चंदुभाई होता आणि आता ज्ञान घेतल्यानंतर शुद्धात्मा झालात, तर त्या अनुभवात काही फरक वाटतो का?

**प्रश्नकर्ता :** हो.

**दादाश्री :** 'मी शुद्धात्मा आहे' हे भान तुम्हाला किती वेळ राहते?

**प्रश्नकर्ता :** एकटे एकांतात बसलेले असतो तेव्हा.

**दादाश्री :** हो. मग कुठला भाव राहतो? तुम्हाला 'मी चंदुभाई आहे' असा भाव होतो का कधी? रियलमध्ये 'मी चंदुभाई आहे' हा भाव कधी झाला होता का?

**प्रश्नकर्ता :** ज्ञान घेतल्यानंतर झाला नाही.

**दादाश्री :** मग तुम्ही शुद्धात्माच आहात. मनुष्याला एकच भाव राहू शकतो. म्हणजे 'मी शुद्धात्मा आहे' हे तुम्हाला निरंतर राहतेच.

**प्रश्नकर्ता :** पण कित्येकदा व्यवहारात शुद्धात्म्याचे भान राहत नाही.

**दादाश्री :** मग 'मी चंदुभाई आहे' असे ध्यान असते? तीन तास शुद्धात्म्याचे ध्यान राहिले नाही पण तीन तासानंतर विचारले की तुम्ही चंदुभाई आहात की शुद्धात्मा आहात? तेव्हा तुम्हा काय सांगाल?

**प्रश्नकर्ता :** शुद्धात्मा.

**दादाश्री :** म्हणजे तेव्हाही ते ध्यान होतेच. एक शेठ आहे, त्याने जेव्हा दारू प्यायली असेल तेव्हा सर्व ध्यान निघून जाईल, पण दारूची नशा उतरल्यानंतर?

**प्रश्नकर्ता :** परत जागृत होईल.

**दादाश्री :** असा हा सुद्धा दुसरा, बाहेरचा परिणाम आहे.

मी जर विचारले, 'खरोखर तुम्ही चंदुभाई आहात की शुद्धात्मा आहात?' तेव्हा तुम्ही म्हणता 'शुद्धात्मा'. दुसऱ्या दिवशी तुम्हाला विचारले, 'तुम्ही वास्तवात कोण आहात?' तेव्हा तुम्ही म्हणता 'शुद्धात्मा'. सतत पाच दिवस मी विचारत राहतो. त्यानंतर मी समजतो की तुमच्या मोक्षाची चावी माझ्याकडे आहे.

## आले अपूर्व भान

श्रीमंद् राजचंद्रजी काय सांगतात की,

*'सद्‌गूरु के उपदेश से आया अपूर्व भान,*
*निजपद निज मांही मिला, दूर भया अज्ञान.'*

(सद्गुरूंच्या उपदेशाने आले अपूर्वभान,
नीजपद निजमध्ये लाभले, दूर झाले अज्ञान.)

या पूर्वी, देहाध्यासाचेच भान होते. पूर्वी देहाध्यासरहित भान आम्हाला नव्हते. ते अपूर्व भान, आत्म्याचे भान आम्हाला झाले. आधी जे 'स्वत:चे' निजपद होते की, 'मी चंदुभाई आहे' असेच बोलत होता, तो 'मी' आता निजमांही (निज स्वरूपात) जाऊन बसला. जे निजपद होते, ते निजमध्ये बसले आणि जे अज्ञान होते, 'मी चंदुलाल आहे' ते अज्ञान दूर झाले.

## याला देहाध्यास म्हणतात

जग देहाध्यासातून मुक्त होऊ शकत नाही आणि स्वत:च्या स्वरूपात राहू शकत नाही. तुम्ही स्वरूपात राहता म्हणजे तुमचा अहंकार गेला, ममता गेली. 'मी चंदुभाई आहे' याला देहाध्यास म्हणतात आणि 'मी शुद्धात्मा आहे' हे लक्ष्य झाले तेव्हापासून कुठल्याही प्रकारचा अध्यास राहिला नाही. आता काहीच राहिले नाही. तरी पण चूकभूल झाल्यावर थोडी घुसमट होते.

## शुद्धात्मा पद शुद्धच!

हे ज्ञान घेतल्यानंतर पूर्वी जी भ्रांती होती की, 'मी करत आहे' हे भान सुटले. म्हणून शुद्धच आहे, हे भान राहण्यासाठी 'शुद्धात्मा' म्हटले. कोणाबरोबर काहीही होऊ दे, 'चंदुभाऊ' शिव्या देऊ दे, तरी पण तुम्ही शुद्धच आहात. मग 'आम्हाला' चंदुभाऊला सांगायला हवे की, 'भाऊ, कोणाला दु:ख होईल असे अतिक्रमण का करता? त्यासाठी प्रतिक्रमण करा.'

कोणाला दु:ख होईल असे काही तुम्ही बोलला असाल, त्यास 'अतिक्रमण' केले असे म्हणतात. त्याचे मग प्रतिक्रमण केले पाहिजे.

प्रतिक्रमण, म्हणजे तुम्हाला समजेल अशाप्रकारे त्याची माफी मागायला हवी. हा दोष झाला ते मला समजले आणि आता असा दोष मी पुन्हा कधी करणार नाही, असा निश्चय तुम्ही केला पाहिजे. असे केले हे चुकीचे केले. असे होता कामा नये, पुन्हा असे कधीही करणार नाही, अशी प्रतिज्ञा करा. परत दुसऱ्यांदा चूक झाली, हा दोष पुन्हा झाला तर पुन्हा पश्चाताप करा. जितके दोष दिसतात, तितक्यांचा पश्चाताप केला तर तितके दोष कमी होतील. असे करत करत शेवटी हळूहळू दोष संपत जातील.

**प्रश्नकर्ता :** एखाद्या व्यक्तीचे प्रतिक्रमण कशाप्रकारे करावे ?

**दादाश्री :** मन-वचन-काया, भावकर्म-द्रव्यकर्म-नोकर्म, (त्या व्यक्तीचे) नाव आणि त्याच्या नावाची सर्व माया, यापासून भिन्न, अशा त्याच्या शुद्धात्म्याची आठवण करा, आणि मग ज्या चुका झाल्या असतील त्यांना आठवा (आलोचना), त्या चुकांचा मला पश्चाताप होत आहे आणि त्यासाठी मला क्षमा करा (प्रतिक्रमण) परत अशा चुका होणार नाहीत, असा दृढ निश्चय करतो, असे ठरवा (प्रत्याख्यान). 'तुम्ही' स्वतः 'चंदुभाऊ'चे ज्ञाता-द्रष्टा रहायचे आणि जाणायचे की 'चंदुभाऊ' ने किती प्रतिक्रमण केले, किती सुंदर प्रतिक्रमण केले आणि किती वेळा केले.

## प्रज्ञा आतून सावध करत राहते

हे विज्ञान आहे म्हणून आम्हाला याचा अनुभव होतो आणि ते आतूनच सावध करेल. तेथे (क्रमिकमध्ये) तर आम्हाला करावे लागते लागेल आणि इथे (अक्रममध्ये) आतूनच सावध करते.

**प्रश्नकर्ता :** आता आतून चेतावणी मिळते असा अनुभव आला आहे.

**दादाश्री :** आता आपल्याला हा मार्ग मिळाला आहे आणि

शुद्धात्म्याची जी बाउंड्री (सीमारेखा) आहे, त्याच्या पहिल्या दरवाज्यात प्रवेश मिळाला आहे. जिथून आता कोणी बाहेर काढू शकणार नाही, बाहेर काढण्याचा अधिकार कोणालाही नाही. अशा जागेत तुम्ही प्रवेश घेतला आहे.

वारंवार सावध कोण करते? तर प्रज्ञा. ज्ञान प्राप्तिशिवाय प्रज्ञेची सुरूवात होत नाही. किंवा सम्यक्त्व प्राप्त झाले असेल तर प्रज्ञेची सुरूवात होते. सम्यक्त्वमध्ये प्रज्ञेची सुरूवात कशी होते? तर द्वितीयेच्या चंद्रासारखी सुरूवात होते. पण आपल्या इथे तर पूर्ण प्रज्ञा उत्पन्न होते. फुल (पूर्ण) प्रज्ञा, म्हणजे ती मोक्षात जाण्यासाठीच सावध करते. भरतराजाला सावध करण्यासाठी नोकर ठेवावे लागत होते. जे दर पंधरा मिनिटाला आवाज देत असत, 'भरतराजा, सावधान, सावधान, सावधान!!' तीन वेळा आवाज द्यायचे. बघा, आपल्याला तर आतूनच प्रज्ञा सावध करते. प्रज्ञा निरंतर सावध करते, 'एय, असे नाही.' दिवसभर सावध करत राहते आणि हाच आत्म्याचा अनुभव! निरंतर, पूर्ण दिवस आत्म्याचा अनुभव.

## अनुभव आत असणारच

ज्या दिवशी ज्ञान देतो, त्या रात्रीचा जो अनुभव आहे, तो जात नाही. कशा जाईल? आम्ही ज्या दिवशी ज्ञान दिले होते, त्या रात्री तुम्हाला जो अनुभव होता तोच अनुभव नेहमीसाठी आहे. पण मग तुमची कर्मे तुम्हाला घेरतात. पूर्वकर्म, जी भोगायची बाकी आहेत, ते 'मागणारे' घेरतात, त्यात मी काय करू?

**प्रश्नकर्ता :** दादाजी, पण आता इतके भोगावे लागत नाही.

**दादाश्री :** भोगावे लागत नाही, ही वेगळी गोष्ट आहे, पण मागणारे (कर्मे) अधिक असतील, त्यांना अधिक घेरतात. पाच वाल्यांनापाच, दोन वाल्यांना दोन आणि वीसवाल्यांना वीस. मी तर

तुम्हाला शुद्धात्मा पदावर बसवले आहे, पण मग मागणारे दुसऱ्या दिवशी आले तर थोडे गुदमरल्यासारखे होईल.

## आता उरले काय?

ते क्रमिक विज्ञान आहे आणि हे अक्रम विज्ञान आहे. हे ज्ञान तर वीतराग भगवंताचेच आहे. ज्ञानात फरक नाही. आम्ही ज्ञान दिल्यानंतर, तुम्हाला आत्म अनुभव झाल्यानंतर, काय काम बाकी राहते? तर ज्ञानी पुरुषांच्या आज्ञेचे पालन. 'आज्ञा' हाच धर्म आणि 'आज्ञा' हेच तप. आणि आमची आज्ञा संसारात अजिबात बाधक होत नाही. संसारात राहूनसुद्धा संसाराचा परिणाम होत नाही. असे हे अक्रम विज्ञान आहे.

बाकी, जर एक अवतारी व्हायचे असेल तर आम्ही सांगितल्याप्रमाणे आज्ञेत राहा. तर हे एक अवतारी विज्ञान आहे. हे विज्ञान आहे तरीसुद्धा इथून (भरत क्षेत्रातून) सरळ मोक्षाला जाता येईल असे संभव नाही.

## मोक्षमार्गात, आज्ञा हाच धर्म...

ज्याला मोक्षाला जायचे आहे, त्याला क्रियेची गरज नाही, ज्याला देवगतीत जायचे आहे, भौतिक सुखांची कामना आहे, त्याला क्रियेची गरज आहे. मोक्षाला जायचे असेल त्याला तर ज्ञान आणि ज्ञानींची आज्ञा, या दोन्हीचीच गरज आहे.

मोक्षमार्गात तप-त्याग असे काहीच करावे लागत नाही. केवळ ज्ञानी पुरुष भेटले तर ज्ञानीची आज्ञाच धर्म, आज्ञाच तप आणि हेच ज्ञान, दर्शन, चारित्र्य आणि तप आहे, ज्याचे प्रत्यक्ष फळ मोक्ष आहे.

## 'ज्ञानी'च्या सानिध्यात रहा

ज्ञानींवर कधीही प्रेमभाव आला नाही. जर ज्ञानींवर प्रेमभाव आला तर त्यानेच सारे काम होऊन जाईल. प्रत्येक जन्मात बायको-मुलांशिवाय दुसरे काही नसतेच ना!

भगवंतानी सांगितले की ज्ञानी पुरुषांकडून सम्यक्त्व प्राप्त झाल्यानंतर ज्ञानी पुरुषाच्या मागेच लागा.

**प्रश्नकर्ता :** कुठल्या अर्थाने मागे लागायचे ?

**दादाश्री :** मागे लागणे, म्हणजे हे ज्ञान प्राप्त झाल्यानंतर दुसरे काही आराधन करायचे नसते, पण आम्ही जाणतो की हे अक्रम आहे. हे लोक अनेक 'फाईली' घेऊन आले आहेत. म्हणून तुम्हाला त्या फाईलींसाठी मोकळे ठेवले आहे, पण याचा अर्थ असा नाही की कार्य पूर्ण झाले. सध्या तुमच्या फाईली खूप आहेत, म्हणून जर तुम्हाला माझ्याजवळ बसवून ठेवले तर तुमच्या 'फाईली' बोलवायला येतील. म्हणून सूट दिली की घरी जाऊन फाईलींचा समभावे निकाल (निपटारा) करा. अन्यथा ज्ञानींच्या जवळच पडून रहायला हवे.

बाकी, तुमच्याकडून जर पूर्ण रूपाने लाभ मिळवता येत नसेल तर रात्रंदिवस, निरंतर खटकायला पाहिजे. फाईली तर आहेत, आणि म्हणूनच ज्ञानी पुरुषांनी सांगितले आहे, आज्ञा दिली आहे की फाईलींचा समभावाने निकाल करा, ही आज्ञाच धर्म आहे ना? हा तर आपला धर्मच आहे. पण तरी मनात खंत वाटली पाहिजे की ह्या फाईली कमी झाल्या तर मी अधिक लाभ घेऊ शकेन.

## त्याला तर महाविदेह क्षेत्र समोर येणार!

ज्याला शुद्धात्म्याचे लक्ष्य बसले आहे, तो इथे भरतक्षेत्रात राहूच शकत नाही. इथे ज्याला आत्म्याचे लक्ष्य बसले आहे, तो महाविदेह क्षेत्रात पोहोचणार, असा नियमच आहे. इथे या दूषमकाळात राहूच शकत नाही. हे शुद्धात्म्याचे लक्ष्य बसले आहे, तो महाविदेह क्षेत्रात एक जन्म किंवा दोन जन्म करून, तीर्थंकरांचे दर्शन करून मोक्षप्राप्ती करेल असा सोपा, सरळ हा मार्ग आहे! आमच्या आज्ञेत राहा. आज्ञाच धर्म आणि आज्ञाच तप! समभावे निकाल करायला हवा. ज्या आज्ञा सांगितल्या

आहेत, त्यात जितके रहाता येइल तितके रहावे, पूर्णपणे राहिलात तर महावीर भंगवंताच्या दशेत राहू शकाल! तुम्ही 'रियल' आणि 'रिलेटिव्ह' पाहत, पाहत जात असाल तेव्हा तुमचे चित्त दुसऱ्या जागी भटकणार नाही. पण जर त्या वेळेस मनातून काही निघाले की मग तुम्ही गोंधळात पडता.

# ( 13 ) पाच आज्ञांचे महत्त्व!

## ज्ञान प्राप्तीनंतर कुठली साधना?

**प्रश्नकर्ता :** या ज्ञानानंतर आता कुठल्या प्रकारची साधना करायला हवी?

**दादाश्री :** साधना तर, ह्या पाच आज्ञांचे पालन करणे हीच! आता आणखी दुसरी कुठलीही साधना नाही. दुसरी साधना बंधनकर्ता आहे. या पाच आज्ञा सोडवणाऱ्या आहेत.

## समाधी घडवून आणतात अशा आज्ञा

**प्रश्नकर्ता :** या ज्या आपल्या पाच आज्ञा आहेत, याच्या व्यतिरिक्त काही आहे का?

**दादाश्री :** पाच आज्ञा तुमच्यासाठी एक कुंपण आहे. त्यामुळे तुमचा माल कोणी चोरू शकणार नाही. हे कुंपण लावल्यामुळे आम्ही तुम्हाला जे ज्ञान दिले आहे ते एक्जॅक्ट, जसेच्या तसे राहील, नाही तर कुंपण कमजोर झाले तर कोणी आत घुसून सर्व बिघडवेल. तेव्हा परत मला दुरूस्त करायला यावे लागेल. म्हणून या पाच आज्ञांमध्ये रहाल तोपर्यंत निरंतर समाधीची आम्ही गॅरंटी देतो.

मी पाच वाक्य आपल्या प्रोटेक्शनसाठी (रक्षणासाठी) देतो. हे ज्ञान तर मी तुम्हाला दिले आणि भेदज्ञानाने वेगळे पण केले. पण आता

ते वेगळेच राहू द्या. यासाठी प्रोटेक्शन देतो ज्यामुळे हे जे कलीयुग आहे, हे कलीयुगवाले त्याला लुटून न नेवोत. 'बोधबीजाचा' अंकुर उगवल्यानंतर पाणी वगैरे शिंपडायला हवे ना? जोपासना करण्यासाठी कुंपण तर लावावे लागणार की नाही.

## दृढ निश्चयच करवितो आज्ञा पालन!

दादाजींच्या आज्ञेचे पालन करायचे आहे, हीच सगळ्यात मोठी गोष्ट आहे. आमच्या आज्ञेचे पालन करायचा निश्चय करायला हवा. आज्ञेचे पालन होत आहे की नाही, ते तुम्हाला पाहायचे नाही. आज्ञेचे पालन जितके होऊ शकेल तितके ठीक, परंतु तुम्ही निश्चय करायला हवा की मला आज्ञेचे पालन करायचे आहे.

**प्रश्नकर्ता :** आज्ञा कमी-जास्त प्रमाणात पालन होत असेल त्यात काही हरकत नाही ना?

**दादाश्री :** 'हरकत नाही' असे नाही. तुम्ही निश्चय करा की आज्ञेचे पालन करायचेच आहे! सकाळपासूनच निश्चय करा की, 'आज्ञेतच रहायचे आहे, आज्ञा पालन करायचे आहे.' निश्चय केला तेव्हापासून माझ्या आज्ञेत आलात, मला इतकेच हवे आहे. पालन होत नाही, त्याची कारणे मला माहीत आहेत. मला पालन करायचे आहे, असा निश्चयच करायचा.

आपल्या ज्ञानाने मोक्ष तर मिळणारच आहे. जर कोणी आज्ञेत राहील तर त्याचा मोक्ष होईल. याबद्दल दुमत नाही. कुणी ज्ञान घेतले असेल पण आज्ञा पाळत नसेल तरीसुद्धा हे ज्ञान उगवल्याशिवाय राहाणार नाही. लोक मला म्हणतात की, 'ज्ञान प्राप्त झालेले काही लोक आज्ञेचे पालन करत नाहीत त्याचे काय?' मी सांगतो, 'हे तुला बघायची गरज नाही, हे मला बघायची गरज आहे. ज्ञान माझ्याकडून घेऊन गेलेत ना. तुझे नुकसान नाही ना झाले?' कारण पाप भस्मसात झाल्याशिवाय राहत

नाही. आमच्या या पाच वाक्यात राहिलात तर तुम्ही पुरून उराल. आम्ही निरंतर पाच वाक्यातच राहतो आणि आम्ही ज्याच्यात राहतो तीच 'दशा' तुम्हाला दिली आहे. आज्ञेत राहिलात तर काम होईल. स्वतःच्या समजुतीने लाख जन्म डोके फोडलेत तरी काहीही निष्पन्न होणार नाही. हे तर आज्ञासुद्धा स्वतःच्या अकलेने पाळतात आणि आज्ञा समजतात तेही स्वतःच्याच समजुतीने ना! म्हणून तिथे पण थोडे थोडे लीकेज होत राहते. तरी पण आज्ञा पालनाच्या मागे त्याचे स्वतःचे भाव तर असेच आहेत की 'मला आज्ञा पाळायचीच आहे.' अर्थात जागृती हवी.

आज्ञा पालन करायला विसरलात तर प्रतिक्रमण करा. माणूस आहे, तर विसरणारच. पण विसरल्यानंतर प्रतिक्रमण करायचे की 'हे दादाजी, हे दोन तास विसरलो, आपली आज्ञा विसरलो. पण मला तर आज्ञा पालन करायच्याच आहेत, मला क्षमा करा.' तर मागील सर्व माफ. शंभरा पैकी शंभर मार्क. मग त्याची जोखीम राहिली नाही. आज्ञेत राहणाऱ्याला हे जग स्पर्श करू शकत नाही. आमच्या आज्ञेचे पालन केल्यावर तुम्हाला काहीही स्पर्श करू शकत नाही. तर आज्ञा देणाऱ्याला चिकटणार? नाही. त्याचे कारण असे आहे की हे परहेतु (दुसऱ्यांच्या कल्याणासाठी) आहे, म्हणून त्यालाही स्पर्शणार नाही आणि डिजोल्व होऊन जाईल. (विरघळून जाईल).

## ही तर आहे भगवंताची आज्ञा !

दादाजींच्या आज्ञेचे पालन करणे म्हणजे ती 'ए.एम.पटेल'यांची आज्ञा नाही. स्वतः 'दादा भगवान'यांची, जे 'चौदालोकाचे' नाथ आहेत, त्यांची आज्ञा आहे. त्याची गॅरंटी देतो. हे तर माझ्या माध्यमातून या सगळ्या गोष्टी निघाल्या आहेत. म्हणून तुम्हाला त्या आज्ञांचे पालन करायचे आहे. 'माझी आज्ञा' नाही, ही दादा भगवानांची आज्ञा आहे. मीसुद्धा त्या भगवानांच्या आज्ञेत राहतो ना!

**जय सच्चिदानंद**

# नित्यक्रम

## प्रातः विधी

❁ श्री सीमंधर स्वामींना नमस्कार करीत आहे. (5)

❁ वात्सल्यमूर्ती 'दादा भगवान' यांना नमस्कार करीत आहे.(5)

❁ प्राप्त मन-वचन-कायेने या जगातील कोणत्याही जीवाला किंचितमात्र पण दु:ख न होवो, न होवो, न होवो. (5)

❁ केवळ 'शुद्धात्मानुभवा'शिवाय या जगातील कोणतीही विनाशी वस्तू मला नको आहे. (5)

❁ प्रकट ज्ञानी पुरुष 'दादा भगवान' यांच्या आज्ञेतच निरंतर राहण्याची परम शक्ती प्राप्त होवो, प्राप्त होवो, प्राप्त होवो. (5)

❁ ज्ञानी पुरुष 'दादा भगवान' यांच्या वीतराग विज्ञानाचे यथार्थतेने संपूर्णपणे, सर्वांगपणे केवळ ज्ञान, केवळ दर्शन आणि केवळ चारित्र्यामध्ये परिणमन होवो, परिणमन होवो, परिणमन होवो. (5)

## नमस्कार विधी

❁ प्रत्यक्ष 'दादा भगवान' यांच्या साक्षीने, वर्तमानात महाविदेह क्षेत्रात विचरत असणारे तीर्थंकर भगवान श्री सीमंधर स्वामींना अत्यंत भक्तिपूर्वक नमस्कार करीत आहे. (40)

❁ प्रत्यक्ष 'दादा भगवान' यांच्या साक्षीने, वर्तमानात महाविदेह क्षेत्रात तसेच अन्य क्षेत्रात विचरत असणारे ॐ परमेष्टी भगवंतांना अत्यंत भक्तिपूर्वक नमस्कार करीत आहे. (5)

❁ प्रत्यक्ष 'दादा भगवान' यांच्या साक्षीने, वर्तमानात महाविदेह क्षेत्रात तसेच अन्य क्षेत्रात विचरत असणारे पंच परमेष्टी भगवंतांना अत्यंत भक्तिपूर्वक नमस्कार करीत आहे. (5)

❋ प्रत्यक्ष 'दादा भगवान' यांच्या साक्षीने, वर्तमानात महाविदेह क्षेत्रात तसेच अन्य क्षेत्रात विहरमान तीर्थंकर साहेबांना अत्यंत भक्तिपूर्वक नमस्कार करीत आहे. (5)

❋ वीतराग शासन देवी-देवतांना अत्यंत भक्तिपूर्वक नमस्कार करीत आहे. (5)

❋ निष्पक्षपाती शासन देवी-देवतांना अत्यंत भक्तिपूर्वक नमस्कार करीत आहे. (5)

❋ चोवीस तीर्थंकर भगवंतांना अत्यंत भक्तिपूर्वक नमस्कार करीत आहे. (5)

❋ श्री कृष्ण भगवंतांना अत्यंत भक्तिपूर्वक नमस्कार करीत आहे. (5)

❋ भरतक्षेत्रात सध्या विचरत असणारे सर्वज्ञ श्री दादा भगवानांना निश्चयाने अत्यंत भक्तिपूर्वक नमस्कार करीत आहे. (5)

❋ दादा भगवानांच्या सर्व समकितधारी महात्म्यांना अत्यंत भक्तिपूर्वक नमस्कार करीत आहे. (5)

❋ संपूर्ण ब्रह्मांडातील जीवमात्रांच्या रियल स्वरूपाला अत्यंत भक्तिपूर्वक नमस्कार करीत आहे. (5)

❋ रियल स्वरूप हे भगवत् स्वरूप आहे, म्हणून संपूर्ण जगाचे भगवत् स्वरूपात दर्शन करीत आहे. (5)

❋ रियल स्वरूप हे शुद्धात्मा स्वरूप आहे, म्हणून संपूर्ण जगाचे शुद्धात्मा स्वरूपात दर्शन करीत आहे. (5

❋ रियल स्वरूप हे तत्व स्वरूप आहे, म्हणून संपूर्ण जगाचे तत्वज्ञानाने दर्शन करीत आहे. (5)

(वर्तमान तीर्थंकर श्री सीमंधर स्वामींना परम पूज्य श्री दादा भगवानांच्या माध्यमातून प्रत्यक्ष नमस्कार पोहचतो. कंसात लिहिलेल्या संख्येनुसार तेवढ्या वेळा दिवसातून एकदा वाचायचे.)

## शुद्धात्मा प्रति प्रार्थना

हे अंतर्यामी परमात्मा! आपण प्रत्येक जीवमात्रांमध्ये विराजमान आहात, तसेच माझ्यामध्ये पण विराजमान आहात, आपले स्वरूप हेच माझे स्वरूप आहे, माझे स्वरूप शुद्धात्मा आहे.

हे शुद्धात्मा भगवान! मी आपल्याला अभेदभावे अत्यंत भक्तिपूर्वक नमस्कार करीत आहे.

अज्ञानतेमुळे मी जे जे काही ★★दोष केले आहेत त्या सर्व दोषांना आपल्या समक्ष जाहीर करीत आहे. त्यांचा हदयपूर्वक खूप पश्चाताप करीत आहे आणि आपल्याजवळ क्षमा प्रार्थित आहे. हे प्रभू! मला क्षमा करा, क्षमा करा, क्षमा करा आणि पुन्हाअसे दोष करू नये अशी आपण मला शक्ती द्या, शक्ती द्या, शक्ती द्या.

हे शुद्धात्मा भगवान ! आपण अशी कृपा करा की आमचे भेदभाव मिटून जावे आणि अभेदस्वरूप प्राप्त व्हावे. आम्ही आपल्यात अभेदस्वरूपाने तन्मायाकार राहो.

★★ (जे जे दोष झाले असतील ते मनात जाहीर करावे.)

## नऊ कलमे

1. हे दादा भगवान! मला, कोणत्याही देहधारी जीवात्म्याचा किंचितमात्र पण अहम् दुभावणार (दुखावणार) नाही, दुभाविला जाणार नाही, किंवा दुभावण्या प्रति अनुमोदन केले जाणार नाही, अशी परम शक्ती द्या.

मला, कोणत्याही देहधारी जीवात्म्याचा किंचितमात्र पण अहम्

दुभावणार नाही अशी स्याद्वाद वाणी, स्याद्वाद वर्तन आणि स्याद्वाद मनन करण्याची परम शक्ती द्या.

2. हे दादा भगवान! मला, कोणत्याही धर्माचे किंचितमात्र पण प्रमाण दुभावणार नाही, दुभावले जाणार नाही किंवा दुभावण्या प्रति अनुमोदन केले जाणार नाही, अशी परम शक्ती द्या.

मला, कोणत्याही धर्माचे किंचितमात्र पण प्रमाण दुभावले जाणार नाही, अशी स्याद्वाद वाणी, स्याद्वाद वर्तन आणि स्याद्वाद मनन करण्याची परम शक्ती द्या.

3. हे दादा भगवान! मला, कोणत्याही देहधारी उपदेशक, साधु, साध्वी किंवा आचार्य यांचा अवर्णवाद, अपराध, अविनय न करण्याची परम शक्ती द्या.

4. हे दादा भगवान! मला कोणत्याही देहधारी जीवात्म्या प्रति किंचितमात्र पण अभाव, तिरस्कार कधीही केला जाणार नाही, करविला जाणार नाही किंवा कर्त्याच्या प्रति अनुमोदन केले जाणार नाही अशी परम शक्ती द्या.

5. हे दादा भगवान! मला, कोणत्याही देहधारी जीवात्म्याशी कधीही कठोर भाषा, तंतीली (टोचणारी) भाषा न बोलण्याची, न बोलवण्याची किंवा बोलण्याऱ्या प्रति अनुमोदन न करण्याची परम शक्ती द्या.

कोणी कठोर भाषा, तंतीली भाषा बोलले तर मला मृदु-ऋजु भाषा बोलण्याची परम शक्ती द्या.

6. हे दादा भगवान ! मला, कोणत्याही देहधारी जीवात्म्या प्रति स्त्री-पुरुष किंवा नपुंसक, कोणताही लिंगधारी असो, तर त्या संबंधी किंचितमात्र पण विषयविकार संबंधी दोष, इच्छा, चेष्टा-चाळे किंवा विचारसंबंधी दोष न करण्याची, न करविण्याची किंवा कर्त्या प्रति अनुमोदन न करण्याची अशी परम शक्ती द्या.

मला निरंतर निर्विकार राहण्याची परम शक्ती द्या.

7. हे दादा भगवान! मला, कोणत्याही रसामध्ये लुब्धपणा न करण्याची शक्ती द्या. समरसी आहार घेण्याची परम शक्ती द्या.

8. हे दादा भगवान! मला कोणत्याही देहधारी जीवात्म्याचा, प्रत्यक्ष किंवा परोक्ष, जिवंत किंवा मृत्यू पावलेल्या, कोणाचाही किंचितमात्र पण अवर्णवाद, अपराध, अविनय केला जाणार नाही, करविला जाणार नाही किंवा कर्त्या प्रति अनुमोदन केले जाणार नाही, अशी परम शक्ती द्या.

9. हे दादा भगवान! मला जगत कल्याण करण्याचे निमित्त बनण्याची परम शक्ती द्या, शक्ती द्या, शक्ती द्या.

(एवढेच तुम्ही दादा भगवान यांच्याजवळ मागायचे. ही दररोज मिकेनिकली (यंत्रवत्) वाचण्याची वस्तू नाही, अंतरात ठेवण्याची वस्तू आहे. ही दररोज उपयोगपूर्वक भावना करण्याची वस्तू आहे. एवढ्या पाठात सर्व शास्त्रांचे सार येऊन जाते.)

## प्रतिक्रमण विधी

प्रत्यक्ष दादा भगवानांच्या साक्षीने देहधारी...... (ज्याच्या प्रति दोष झाला असेल त्या व्यक्तीचे नाव) च्या मन-वचन-कायेचे योग, भावकर्म, द्रव्यकर्म, नोकर्माहून भिन्न असे हे शुद्धात्मा भगवान! आपल्या साक्षीने आजच्या दिवसापर्यंत जे जे ★★ दोष झाले आहेत, त्यांची क्षमा मागत आहे, हृदयपूर्वक खूप पश्चाताप करीत आहे. मला क्षमा करा, क्षमा करा, क्षमा करा. आणि पुन्हा असे दोष कधीही करणार नाही, असा दृढ निश्चय करीत आहे, त्यासाठी मला परम शक्ती द्या

★★ क्रोध-मान-माया-लोभ, विषय-विकार, कषाय इत्यादीपासून त्या व्यक्तीला दु:ख दिले गेले असेल त्या सर्व दोषांना मनात आठवायचे.

# ज्ञानसाक्षात्कार प्राप्ती हेतू व्यवहारविधी

प्रकट 'ज्ञानी पुरुष' दादा भगवानांना अत्यंत भक्तीने नमस्कार करीत आहे, नमस्कार करीत आहे, नमस्कार करीत आहे.

ज्यांना प्रकट 'ज्ञानी पुरुष' द्वारे 'सत्' प्राप्त झाले आहे, त्या 'सत् पुरुषांना' अत्यंत भक्तीने नमस्कार करीत आहे, नमस्कार करत आहे, नमस्कार करीत आहे.

सर्व निष्पक्षपाती देवी-देवतांना अत्यंत भक्तीने नमस्कार करीत आहे, नमस्कार करीत आहे, नमस्कार करीत आहे.

हे प्रकट ज्ञानीपुरुष आणि हे सर्व सत्पुरुष आजच्या या भडकलेल्या आगीत जळत असलेल्या जगाचे कल्याण करा, कल्याण करा, कल्याण करा आणि त्यात मी निमित्त बनू अशा शुद्ध भावनेने आपल्या समक्ष मन-वचन-कायेच्या एकाग्रतेने प्रार्थनाविधी करीत आहे, जी आत्यंतिक सफळ होवो, सफळ होवो, सफळ होवो.

हे दादा भगवान ! आपल्या शुद्ध ज्ञानात अवलोकन झालेले आणि आपल्या श्रीमुखातून प्रकटलेले शुद्ध ज्ञानसूत्र या प्रमाणे आहेत :-

''मन, वचन, कायेचे जे तमाम लेपायमान भाव आहे त्यापासून 'शुद्ध चेतन' सर्वथा निर्लेपच आहे. (3)

''मन, वचन, कायेच्या तमाम संगी क्रियांपासून 'शुद्ध चेतन' पूर्णपणे असंगच आहे.' (3)

''मन, वचन, कायेच्या सवयी आणि त्यांच्या स्वभावाला 'शुद्ध चेतन' जाणतो आणि स्वतःच्या स्व-स्वभावालाही 'शुद्ध चेतन' जाणतो.' कारण की तो स्व-पर प्रकाशक आहे. (3)

''आहारी आहार करतो आणि निराहारी 'शुद्ध चेतन' मात्र त्याला जाणतो '' (3)

''स्थूल संयोग, सूक्ष्म संयोग, वाणीचे संयोग पर आहेत आणि पराधीन आहेत, आणि 'शुद्ध चेतन' मात्र त्यांचा ज्ञाता-दृष्टा आहे.''(3)

''स्थूलतमपासून सूक्ष्मतमपर्यंतच्या तमाम सांसारिक अवस्थांचा 'शुद्ध चेतन' मात्र ज्ञाता-दृष्टा आहे, टंकोत्कीर्ण आहे, आनंदस्वरूप आहे.'' (3)

''मन, वचन, कायेची अवस्था केवळ कुदरती (नैसर्गिक) रचना (Only scientific circumstantial evidence) आहे, ज्याचा कोणी बापही रचनाकार नाही आणि ते 'व्यविस्थत' आहे.'' (3)

''निश्चेतन-चेतनचा एक पण गुण, 'शुद्ध चेतन'मध्ये नाही आणि 'शुद्ध चेतन'चा एक पण गुण निश्चेतन-चेतनमध्ये नाही. दोन्ही सर्वथा भिन्न आहेत.'' (3)

''चंचल भागांचे जे जे भाव आहेत, ते निश्चेतन-चेतनचे भाव आहेत आणि 'शुद्ध चेतन,' की जो अचल आहे त्याचे भाव नाहीत.'' (3)

हे प्रभू ! भ्रांतिमुळे मला 'शुद्ध चेतन'चे भाव वरील सूत्रांनुसार 'हेच' आहेत असे यथार्थ जसे आहे तसे समजले नाहीत, कारण की निष्पक्षपाती भावाने मी स्वत: स्वत:ला पाहिले तेव्हा मला समजले की माझ्यातले अंतरक्लेश आणि कढापा-अजंपा (क्रोध-बैचेनी) गेलेले नाहीत. अत: हे प्रभू ! माझा अंतरक्लेशाला शमन करण्यासाठी परम शक्ती द्या. या शुद्ध भावांना जसे आहे तसे समजण्याशिवाय आता माझी इतर कोणतीही कामना नाही. मी केवळ मोक्षाचाच कामी आहे. त्या हेतूने माझी दृढ अभिलाषा आहे की मी 'सत् पुरुषांच्या विनय' व 'ज्ञानी पुरुषांच्या परम विनय' मध्ये राहून, मी काहीच जाणत नाही, या भावनेतच राहो.

वरील ज्ञानसूत्रांनुसार शुद्ध भाव माझ्या श्रद्धेत आणि माझ्या ज्ञानातही येत नाहीत. जर हे भाव माझ्या दृढ श्रद्धेत येतील तरच मी अनुभवेल की मला यथार्थ सम्यक् दर्शन झाले आहे. यासाठी दोनच गोष्टी मुख्य आहेत:-

1) मी 'परम-सत्य जाणण्याचा च कामी आहे' ही भाव-निष्ठा.

2) 'परम-सत्य' 'ज्ञानी पुरुष' यांच्या आज्ञेच्या संपूर्ण आराधनेनेच प्राप्त होते.

'ज्ञानी पुरुष' यांच्या प्रत्यक्ष योगाशिवाय अन्य कोणताही मार्ग नाही, अतः प्रत्यक्ष 'ज्ञानी पुरुष' यांच्या शोधातच राहू आणि त्यांचा योग प्राप्त झाल्यावर मी त्यांच्याच आज्ञेच्या आराधनेत राहण्याचा दृढ निर्णय-निश्चय करीत आहे. ही माझी मनोकामना सफळ होवो, सफळ होवो, सफळ होवो.

- **जय सच्चिदानंद**

आत्मज्ञानी पुरुष ए. एम. पटेल यांच्यामध्ये प्रकट झालेल्या

**''दादा भगवानना असीम जय जयकार हो''**

(दादा भगवानांचा असीम जय जयकार हो)

(दररोज कमीत कमी 10 ते 50 मिनिटांपर्यंत म्हणायचे).

# दादा भगवान परिवार


**अडालज** : **त्रिमंदिर**, सीमंधर सिटी, अहमदाबाद-कलोल हाईवे, पोस्ट : अडालज, जि.-गांधीनगर, गुजरात - 382421. फोन : (079) 39830100

**राजकोट** : **त्रिमंदिर**, अहमदाबाद-राजकोट हाईवे, तरघड़िया चोकड़ी (सर्कल), पोस्ट : मालियासण, जि.-राजकोट. फोन : 9924343478

**भुज** : **त्रिमंदिर**, हिल गार्डनच्या मागे, एयरपोर्ट रोड. फोन : (02832) 290123

**अंजार** : **त्रिमंदिर**, अंजार-मुंद्रा रोड, सिनोग्रा पाटीया जवळ, सिनोग्रा गाँव, ता-अंजार. फोन : 9924346622

**मोरबी** : **त्रिमंदिर**, पो-जेपुर (मोरबी), नवलखी रोड, ता-मोरबी, जि-राजकोट, फोन : (02822) 297097

**सुरेन्द्रनगर** : **त्रिमंदिर**, लोकविद्यालय जवळ, सुरेन्द्रनगर-राजकोट हाईवे, मुळी रोड. फोन : 9879232877

**अमरेली** : **त्रिमंदिर**, लीलीया बायपास चोकडी, खारावाडी. फोन : 9924344460

**गोधरा** : **त्रिमंदिर**, भामैया गाँव, एफसीआई गोडाउन समोर, गोधरा, (जि.-पंचमहाल). फोन : (02672) 262300

**वडोदरा** : **त्रिमंदिर**, बाबरिया कोलेज जवळ, वडोदरा-सुरत हाई-वे NH-8, वरणामा गाँव. फोन : 9574001557

**जामनगर** : **त्रिमंदिर,** व्रजभूमि-1 च्या समोर, TGES स्कूल जवळ, माणेक नगर, राजकोट रोड.

**अहमदाबाद** : **दादा दर्शन**, 5, ममतापार्क सोसाइटी, नवगुजरात कॉलेजच्या मागे, उस्मानपुरा, अहमदाबाद-380014. फोन : (079) 27540408

**वडोदरा** : **दादा मंदिर**, 17, मामानी पोळ-मुहल्ला, रावपुरा पुलिस स्टेशन समोर, सलाटवाड़ा, वडोदरा. फोन : 9924343335

| | | | |
|---|---|---|---|
| **मुंबई** | : 9323528901 | **दिल्ली** | : 9810098564 |
| **कोलकता** | : 9830093230 | **चेन्नई** | : 9380159957 |
| **जयपुर** | : 9351408285 | **भोपाल** | : 9425024405 |
| **इन्दौर** | : 9039936173 | **जबलपुर** | : 9425160428 |
| **रायपुर** | : 9329644433 | **भिलाई** | : 9827481336 |
| **पटना** | : 7352723132 | **अमरावती** | : 9422915064 |
| **बेंगलूर** | : 9590979099 | **हैदराबाद** | : 9989877786 |
| **पूणे** | : 9422660497 | **जालंधर** | : 9814063043 |

**U.S.A.** : **DBVI Tel. :** +1 877-505-DADA (3232),
**Email :** info@us.dadabhagwan.org

| | | | |
|---|---|---|---|
| **U.K.** | : +44 330-111-DADA (3232) | **Australia** | : +61 421127947 |
| **Kenya** | : +254 722 722 063 | **New Zealand** | : +64 21 0376434 |
| **UAE** | : +971 557316937 | **Singapore** | : +65 81129229 |



# जीवनाचे ध्येय

जर हा संसार आपल्याला अनुकूल वाटत असेल तर पुढे काहीही समजून घेण्याची गरज नाही, आणि जर हा संसार आपल्याला प्रतिकूल( हरकतकर्ता )वाटत असेल तर अध्यात्म जाणून घेण्याची आवश्यकता आहे.

अध्यात्मात, 'स्वरूप' जाणणे खूप गरजेचे आहे. 'मी कोण आहे,' हे जाणले कि सर्व पझल्स ( कोडी ) सॉल्व होतात.

– दादाश्री

dadabhagwan.org

ISBN 978-81-89933-36-4

9 788189 933364

Printed in India

MRP ₹10